◆ ऑक्टोबर २००४
◆ वर्ष चौथे
◆ अंक दहावा

मेहता मराठी ग्रंथजगत

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— *अनुक्रमणिका* —

संपादकीय २
साहित्यवार्ता ५
पुस्तक परिचय
द गोल्डन रॉन्देव्हू : अनु. अशोक पाध्ये २१
प्रियाराधन आणि विवाह : अनु. सुप्रिया वकील २५
फिटे अंधाराचे जाळे : भालचंद्र करमरकर ३२
वि. स. खांडेकर स्मृतिदिन : पुस्तकांची झलक ३८
श्रद्धांजली : माधव मोर्डेकर ४६
पुरस्कार ४९
बालनगरी ५१

✠ मांडणी-अक्षरजुळणी : ✠
मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, मार्डीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

खपाचे उच्चांक गाठणारी वाचकप्रिय कादंबरी : दि दा विंची कोड

कथाकादंबऱ्यांचे आकर्षण माणसाच्या मनात खोलवर रुजलेले आहे, यात शंकाच नाही. फक्त त्यासाठी त्याला खिळवून ठेवणारी उत्तम कथावस्तू पाहिजे. बेस्ट सेलर्सचा खप लाखांनी होतो तो उगाच नाही. बेस्टसेलर्सचे अनुवाद जगाच्या वेगवेगळ्या भाषांतून होतात ते उगाच नाही. वर्षानुवर्षे, पिढ्यानुपिढ्या ही पुस्तके वेगवेगळ्या देशातल्या वाचकांना खिळवून ठेवण्यात यशस्वी ठरतात, ते उगाच नाही. हॅरी पॉटरने हे पुन्हा आपल्या मनावर ठसवले आहे. जन्मजात जादूगार असतात; आणि त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी खास विद्यालय आहे; त्याचा सात वर्षांचा अभ्यासक्रम आहे; त्या अभ्यासक्रमात अदृश्य होणे, जलद प्रवास करणे, वेगवेगळ्या प्राण्यांमध्ये वा वस्तूमध्ये रूपांतर घडवून आणणे, कालप्रवास करणे, चित्रातून वा अग्नीतून प्रकट होणे - प्रवास करणे, चेटकिणीच्या ब्रूम्सचा वापर करणे, जादूच्या काठ्यांचा वापर करणे, दुसऱ्याच्या मनात शिरून त्याचा कब्जा घेणे, वेगवेगळी रासायनिक जादूची द्रव्ये बनविणे, जादूच्या बसमधून प्रवास करणे (ही बस आपला आकार लहानमोठा करीत गल्ल्याबोळातूनही सुसाट धावू शकते, बोलू शकते) अजस्त्र प्राण्यांना मंत्र म्हणून काबूत आणणे, कबुतर - घुबड किंवा एल्फद्वारे संदेश पाठवणे, अशा क्लृप्त्यांमध्ये प्रावीण्य मिळवण्याच्या दृष्टीने या विद्यालयातील अभ्यासक्रम आणि त्यासाठी लागणारी पुस्तके व साधने, प्रयोगशाळा व उपकरणे दाखवून नाट्यपूर्ण कथानकांच्या द्वारे वाचकांना जे के रोलिंग या लेखिकेने झपाटून टाकले आहे. काही कोटींच्या घरात हॅरी पॉटरच्या या पुस्तकांची विक्री झाली असून रोलिंगला इंग्लंडमधील सर्वात श्रीमंत महिला बनण्याचा, इंग्लंडच्या राणीपेक्षाही श्रीमंत बनण्याचा मान प्राप्त झाला आहे.

असेच एक दुसरे पुस्तक गेल्या काही महिन्यात जगभरच्या वाचकांना मंत्रमुग्ध करताना दिसते आहे. मुंबईच्या स्ट्रँड बुक स्टॉलने या कादंबरीच्या अकरा हजार प्रती एकट्याने विकल्या आहेत; आणि क्रॉसवर्ड ने पाच हजार. यावरून या पुस्तकाच्या लोकप्रियतेची चुणूक जाणवू शकेल. वाचकच त्याची एकमेकांना शिफारस करतात; आणि या व्यक्तिगत शिफारशीने या पुस्तकाची मागणी फोफावत आहे.

या पुस्तकाचे नाव आहे दि दा विंची कोड. जाहिरातबाजी वा मार्केटिंग फारसे न करताही या पुस्तकाच्या लक्षावधी प्रती खपल्या आहेत. तेव्हा तिच्या कथानकात जबर दस्त नाट्य असणार हे उघडच आहे. चांगली नाट्यपूर्ण कथावस्तू ही वाचकांना हवीहवीशी

वाटते, त्या कथावस्तूवर ते जीव टाकतात हे यावरून पुन्हा मनावर ठसते.

'दि दा विंची कोड'ही एक थरारकथा आहे; पॅरिस, न्यूयॉर्क, एडिंबरो, लंडन, रोम या शहरांमध्ये ती वाचकाला फिरवून आणते. डॅन ब्राऊन या लेखकाने या थरारकथेद्वारे बेस्टसेलर लेखकांच्या मालिकेत स्थान मिळवले आहे.

पॅरिसमधील लूव्हरे संग्रहालयात लिओनार्दो द विंची, राफेल, मायकेल एंजेलो वगैरे रेनेसान्स काळातील कलावंतांच्या कलाकृतींची खास दालने आहेत. लिओनार्दोला या थरारकथेत मध्यवर्ती स्थान आहे.

लूव्हरे म्युझियमचा क्युरेटर जेकस सॉनियर याची भेट घेण्यासाठी हार्वर्ड विद्यापीठातील प्राध्यापक रॉबर्ट लँगडन पॅरिसला आलेला आहे; आणि रिट्झमध्ये मुक्कामाला आहे. दुसऱ्या दिवशी भेटीची वेळ ठरलेली आहे. तो प्रतीकांचा संशोधक व अभ्यासक आहे. सिम्बॉल्समधील स्पेशॅलिस्ट आहे. मध्यरात्रीच्या सुमाराला पॅरिसचे पोलिस त्याला झोपेतून उठवतात आणि त्याची चौकशी करतात. सॉनियरचा खून झालेला आहे अशी बातमी ते देऊन, ते लँगडनच्या सॉनियरच्या भेटीला येण्याचे कारण जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. सॉनियरचा खून झालेला असतो, आणि लिओनार्दो द विंचीच्या 'व्हिट्युव्हियनमॅन'या चित्रातील व्यक्तीप्रमाणे त्याची मृत्यूनंतर पोझ असते; त्या चित्राद्वारे काहीतरी संदेश तो देऊ पाहत असावा, त्याला ठाऊक असलेले काहीतरी गुपित त्याला आपल्याबरोबर नष्ट होऊ नये, ते पुढच्या पिढ्यांनी जाणून घ्यावे अशी त्याची इच्छा असावी असा अर्थ लावून रॉबर्ट लँगडन ते गुपित जाणून घेण्याचे ठरवतो. या कामी सॉनियरची नात सोफी नेव्यू ही सांकेतिक लिप्यांचा उलगडा करण्यात निष्पात आहे. सांकेतिक लिप्यांचा तिचा उत्तम व्यासंग आहे. या दोघांच्या प्रयत्नातून त्यांना प्रिओरी ऑफ सायन या धार्मिक पंथाची माहिती मिळते. हा पंथ गुप्त संघटनेच्या स्वरूपात येशू ख्रिस्तांच्या काळापासून चालत आलेला आहे असा शोध त्यांना लागतो. व्हॅटिकनच्या म्हणजे पोपच्या ओपस देइ या स्वतंत्र धार्मिक संघटनेद्वारेही खुनी सिलास हे गुपित साध्य करण्यासाठी धडपडत असतो. त्यामुळे ओपस देईच्या छुप्या सैनिकांशीही लँगडन-सोफी यांना लढत द्यावी लागते. त्यासाठी या संघटनेचा प्रमुख धर्मोपदेशक खुनी सिलास सेंट सल्फाइसच्या कॅथेड्रलकडे मोर्चा वळवतो. सतराव्या शतकात बांधलेल्या या कॅथेड्रलची व्यवस्था सिस्टर सँडरिन हिच्याकडे असते. सॉनियरचे गुपित अजूनही अज्ञात राहिल्याने लँगडन आणि सोफी हे दोघे होली ग्रेलचा अभ्यासक ले टीविंग याच्या घरी जातात. ओपस देईचा बिशप अरिंगारोसा याला गॅन्डोल्फो कॅसल मध्ये एक गुप्त बैठकीसाठी बोलावण्यात येते. हा किल्ला अल्बत टेकड्यांमध्ये असतो. ओपस देई ही संघटना अत्यंत श्रीमंत असते आणि आपल्या संदस्यांकडून ती संपूर्ण निष्ठेची अपेक्षा करते. सदस्यांची अत्यंत शुद्ध चारित्र्य व वर्तन ठेवावे तसेच संघटनेसाठी प्राणही देण्याला सिद्ध असावे अशी शपथ घ्यावी लागते. या संघटनेचे ८० हजार सदस्य असून मुख्य केंद्र रोममध्ये आहे. न्यूयॉर्कमध्ये तिचे केंद्र लेक्सिंग्टन ॲव्हेन्यूवरील ३३ हजार चौ. फूटांच्या प्रशस्त इमारतीत आहे. त्यात शंभर बेडरुम्स आणि सहा भोजनगृहे आहेत. ग्रंथालय आणि सभागृहे आहेत. स्त्री पुरुषांसाठी स्वतंत्र प्रवेशद्वारे आहेत.

लँगडन आणि सोफी यांना दुसरे क्रिप्टेक्स कोड उलगडण्यात यश मिळते. त्यानंतर ते स्कॉटलंडमधील एडिंबरोजवळच्या रोझलिन या खेड्यात पोचतात; तेथे या कादंबरीच्या कथावस्तूचा उत्कर्षबिंदू गाठला जातो. येथील चॅपेलच्या इमारतीखाली एक होली ग्रेलचे निवासस्थान आहे अशी दंतकथा आहे. होली ग्रेल हे एक धार्मिक प्रतीक आहे.

लिओनार्डो द विंचीच्या या चित्रातून या गुपिताची प्राथमिक दिशा सूचित होते. मोनालिसाच्या चित्रातील स्त्री ही फ्रॅन्सेस्को देल गिओकोंडो या लक्षाधीशाची पत्नी असून हे चित्र १५०३ मध्ये काढले गेले असे इतिहासावरून दिसते. लँगडन या तारखेबद्दल वाद निर्माण करतो आणि तिच्या गूढ स्मितहास्यावरही वेगळेच भाष्य करतो.

... पॅरिस, न्यूयॉर्क, एडिंबरो, लंडन व रोम अशा ठिकाणी वाचकांना घेऊन जाणारी, रेनेसान्स काळापासून आजच्या ताज्या घटनांना कथानकात सामावून घेणारी, एका गुपिताचा उलगडा करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या दोन गटातील संघर्ष दाखवणारी 'दि दा विंची कोड' ही थरारकथा वेगवेगळ्या भागातील आणि भाषातील वाचकांना भुरळ घालू शकते; अशी विलक्षण ताकद या कथा वस्तूत आहे यात शंकाच नाही, पॅरिसच्या लूव्हरे म्युझियमपासून सुरू झालेली ही कथा स्कॉटलंडच्या एडिंबरो येथे कळसाला पोचते.

चांगली वाचनीय पुस्तके आली तर वाचक ती विकत घेण्यात, वाचण्यात कसूर करीत नाही. चांगली पुस्तके आली तर फार मोठ्या मार्केटिंगच्या मोहिमा न राबवताही केवळ माऊथ पब्लिसिटीच्या आधारे ती प्रचंड वाचकवर्गापर्यंत पोचू शकतात हे संबंधितांच्या मनावर ठसवणारी ही कादंबरी आहे. अशा उत्तम कथानिवेदकांची, कथानकांची आज मितीला फार मोठी गरज आहे.

हे पुस्तक आम्ही लवकरच मराठीत सादर करीत आहोत. या मराठी आवृत्तीच्याही १०-१५ हजार प्रती हातोहात खपाव्यात अशी अपेक्षा करायला हरकत नाही!

आता मराठीत येत आहे....
जेम्स बॉंडचा झंजावात....

फ्रॉम रशिया विथ लव्ह

इयान फ्लेमिंग अनुवाद विजय देवधर

किंमत : **२५०रु.**
ग्रंथजगतच्या सभासदांना : **१७५रु.**
टी बुक क्लबच्या सभासदांना : **१२५रु.**
पोस्टेज : **२५रु.**

साहित्यवार्ता

* प्रगतीचे प्रतिबिंब मराठी साहित्यात उमटावे : डॉ. चितळे

''देशात घडणाऱ्या प्रगतीचे, परिवर्तनाचे प्रतिबिंब मराठी साहित्यात उमटण्याची आवश्यकता आहे,'' असे मत ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे यांनी व्यक्त केले.

दुसऱ्या अखिल भारतीय जलसाहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. संमेलनाध्यक्ष मधू मंगेश कर्णिक, 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव दीपक भसाळे, भास्कराव म्हस्के, स्वागताध्यक्ष कमलाकांत, वडेलकर, अरुण साबणे, वसंतराव शिंपी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. चितळे म्हणाले, ''देशातील प्रत्येक विभागात निसर्ग वेगळा आहे आणि त्याने उभी केलेली आव्हानेही विभागानुसार वेगळी आहेत. बिहारमधील पुराची, केरळमध्ये रौद्ररूप धारण करणाऱ्या पावसाची कल्पना महाराष्ट्राला येणार नाही. आसामवासीयांना पूर आणि वादळ दोन्हींचा सामना करावा लागत आहे. या निसर्गाने उभी केलेली आव्हाने पेलत विकासाचे नवे पर्व देशात सुरू झाले आहे. त्यासाठी अभियंते, कामगार झटत आहेत. त्यांची ही यशोगाथा समाजासमोर यायला हवी.''

ते म्हणाले, ''दहशतवादाने ग्रासलेल्या जम्मू भागात उरी जलविद्युत प्रकल्प उभा राहिला आहे. आजूबाजूला दहशतवाद्यांच्या गोळ्यांच्या फैरी झडत असताना हा प्रकल्प पूर्ण करणे अवघड काम होते. हा प्रकल्प उभा राहणे हा कादंबरीचा विषय ठरणार नाही का, याचा साहित्यिकांनी विचार करायला हवा. जल व्यवस्थापन क्षेत्रात बदल घडत आहेत. त्यासाठीची माहिती ही केवळ अहवालात दिसते. ती सामान्य वाचकांपर्यंत पोचविण्याचे काम साहित्यिकांनी करावे. केवळ महाराष्ट्रापुरता विचार न करता देश पातळीवर घडणारे हे बदल मराठी साहित्यात येणे गरजेचे आहे. साने गुरुजींनी सुरू केलेली आंतरभारतीची चळवळ त्यासाठी मला योग्य वाटते.''

श्री. कर्णिक म्हणाले,''पाणी आता प्रगतीचे साधन बनले आहे. पुढील काळात पाण्याला येणारे महत्त्व पाहता त्याविषयी सामान्यांमध्ये अधिक जागृती होण्याची गरज आहे. या संमेलनासारखे उपक्रम त्यासाठी उपयुक्त ठरतील. डॉ. चितळे यांनी मराठी साहित्याकडून व्यक्त केलेली अपेक्षा यथोचित आहे. त्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवा.''

श्री. दीक्षित म्हणाले, ''पाणीप्रश्नी घडणारी जागृती हवी आहे. या प्रश्नातील लोकसहभाग वाढविण्याच्या चळवळीला अधिक गती येण्याची गरज आहे. या संमेलनाद्वारे पाणी आणि त्याविषयीची समग्र परिस्थिती, देश आणि राज्य पातळीवरील स्थिती यासंबंधीची माहिती

जनतेपुढे यायला हवी. जलसाहित्य हा प्रकार मराठी साहित्यात तेजस्वीपणे पुढे येईल, असा विश्वास या उपक्रमांमुळे मिळतो आहे.''

जलसुधार प्रकल्प व स्वजलधारा योजना राबविण्यात महाराष्ट्र अग्रेसर असल्याचे श्री. साबणे यांनी स्पष्ट केले. नदीजोड प्रकल्प व इतर योजनांविषयी सामान्यजनांत असलेला गोंधळ अभियंत्यांनी दूर करावा, अशी अपेक्षा श्री. म्हस्के यांनी व्यक्त केली.

वसंतराव शिंपी यांनी प्रास्ताविक केले. श्री. वडेलकर यांनी आभार मानले. स्वाती पाटणकर यांनी सूत्रसंचालन केले.

* रंगकर्मींच्या मते 'हॅम्लेट'च सर्वोत्कृष्ट

अभिजात नाटककार विल्यम शेक्सपिअरच्या लेखणीतून साकारलेला राजपुत्र हॅम्लेट अनेकदा 'टू बी, ऑर, नॉट टू बी' अशा द्विधा मनस्थितीत असायचा. शेक्सपिअरच्या नाटकांची गुणवत्ता जोखताना रंगकर्मींची मात्र तशी द्विधा मनोवस्था नसावी; कारण 'हॅम्लेट' हे या नाटककाराचे सर्वोत्कृष्ट नाटक असल्याची मोहर या मंडळांनी उमटवली आहे.

'रॉयल शेक्सपिअर कंपनी' ही ब्रिटनमधील प्रख्यात नाटक कंपनी. शेक्सपिअरची अनेक नाटके सादर करणाऱ्या या कंपनीने शेक्सपिअरच्या नाटकांच्या गुणवत्तेचा लेखाजोखा घेतला तो त्याच्याच लेखणीतून उतरलेली पात्रे रंगभूमीवर जिवंत करणाऱ्या कलाकार मंडळींकडून. विविध नाटकांची गुणवत्ता जोखत या मंडळींनी सर्वाधिक पसंती दिली ती 'हॅम्लेट'ला. त्यांच्यामते 'हॅम्लेट' हे शेक्सपिअरचे सर्वोत्कृष्ट नाटक ठरले.

'हॅम्लेट' हे सर्वोत्कृष्ट नाटक आजच्या काळाशीही नाते सांगते. मानवी वृत्ती प्रवृत्तींचा वेध घेणारे हे नाटक एकमेवाद्वितीय आहे, असा गुणगौरवही या मंडळींकडून 'हॅम्लेट'ला मिळाला. 'शेक्सपिअर टॉप टेन'मध्ये 'हॅम्लेट'पाठोपाठ जागा मिळवली 'किंग लिअर'ने आणि त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर आले 'अँटोनी अँड क्लिओपात्रा', 'हेन्री चवथा - भाग दुसरा', 'ट्वेल्थ नाईट', 'मॅकबेथ', 'ऑथेल्लो', 'टाटयस अँड्रोनिकस', 'ए मिडसमर नाईट्स ड्रीम', 'द टेम्पेस्ट'या नाटकांनी 'टॉप टेन'मध्ये स्थान मिळवले.

शेक्सपिअरच्या नाटकांतील विविध पात्रे किती कसदारपणे उतरली आहेत, याचा विचारही या नाट्यकर्मींनी केला. 'द विंटर्स टेल'मधील पॉलिना हे पात्र त्यांना मुळीच भावले नाही. शेक्सपिअरच्या नाटकांची ही समीक्षा केली २०० नाट्यकर्मींनी.

सर इयन मॅकमिलन, सर अँटोनी शर, जेनेट सुझमन, इयन रिचर्डसन, सर डोनाल्ड सिंडेन आणि कॉरिन रेडग्रेव्ह अशा दिग्गजांचा त्यात समावेश होता.

* भारतातील संशोधनाचे बौद्धिक संपदा हक्क मिळवावेत - माशेलकर

विद्यापीठात होणाऱ्या संशोधनांचे बौद्धिक संपदा हक्क मिळविल्यास विद्यापीठांना उत्पन्नाचा नवा स्रोत उपलब्ध होईल. त्यामुळे भारतातील सर्व विद्यापीठांत होणाऱ्या संशोधनाचे बौद्धिक संपदा हक्क मिळवावेत असे आवाहन वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेचे संचालक आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांनी केले.

पुणे विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या बौद्धिक संपदा हक्क धोरण पुस्तिकेचे माशेलकर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्यानंतर ते बोलत होते. पुणे विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क संकेतस्थळाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांनी केले. बौद्धिक संपदा हक्काची माहिती देणारे पुणे विद्यापीठ देशातील पहिले विद्यापीठ ठरले आहे.

बौद्धिक संपदा हक्काबाबत सध्या देशात जागरूकता निर्माण होत आहे. पूर्वी फक्त रसायनशास्त्रातील शास्त्रज्ञ पेटंट मिळविण्यासाठी पुढे येत होते. मात्र आता जीवशास्त्रज्ञ मोठ्या प्रमाणात पुढे येत आहेत. पेटंटमुळे सरस्वती आणि लक्ष्मी एकत्र नांदू शकतील असे माशेलकर यांनी या वेळी सांगितले.

दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठ नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे. अशाप्रकारचे संकेतस्थळ खरगपूर आणि कानपूर आयआयटीने सुरू केले आहे. मात्र पेटंटबाबत धोरण ठरविणारे पुणे विद्यापीठ देशातील पहिले असल्याचे कोळस्कर यांनी सांगितले. या वेळी एकबोटे यांचेही भाषण झाले. कटारिया यांनी प्रास्ताविक केले.

* भारतीय शास्त्रज्ञाने शोधला 'स्किझोफ्रेनिया'चा जनुक?

स्किझोफ्रेनिया या मनोविकारास कारणीभूत ठरणाऱ्या जनुकाचा शोध लागल्याचा दावा भारतीय शास्त्रज्ञानी केला आहे.

'स्किझोफ्रेनिया'चे रुग्ण असणाऱ्या एकाच कुटुंबातील तीन सदस्यांमध्ये 'सिनॅप्टोजिरिन १' या जनुकामध्ये गुणविस्तार होत असल्याचे शास्त्रज्ञांना आढळून आले. हा जनुक २२ व्या गुणसूत्रावर असतो. याच भागातील बदलांमुळे स्किझोफ्रेनिया होत असल्याचे आजवरच्या अभ्यासांवरून स्पष्ट झाल्याचे इन्स्टिट्यूट ऑफ जिनॉमिक्स अँड इंटीग्रेटिव्ह बायलॉजी'चे संचालक प्रा. समीर ब्रह्मचारी यांनी सांगितले.

या अभ्यासात 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्स नेही भाग घेतल्याची व अमेरिकेच्या पेटंट विभागाने गुणविस्तार शोधण्याच्या पद्धतीला मान्यता दिल्याची माहितीही ब्रह्मचारी यांनी दिली.

ज्या तिघांमध्ये या जनुकाचा गुणविस्तार आढळून आला त्यांना 'पॅरानॉइड स्किझोफ्रेनिया'झाला होता. या जनुकाद्वारे निर्माण होणाऱ्या प्रथिनांमुळे हा रोग होत असावा, असे ब्रह्मचारी यांनी स्पष्ट केले.

आश्चर्याची बाब म्हणजे याच कुटुंबातील ज्या चौथ्या सदस्याला हा रोग नव्हता त्याच्या या जनुकामध्येही गुणविस्तार आढळून आला. पण बहुधा 'स्किझोफ्रेनिया' कारणीभूत ठरणाऱ्या इतर जनुकांमधील गुणविस्ताराच्या अभावी हा रोग त्याला झाला नसावा, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. तसेच, याच कुटुंबातील स्किझोफ्रेनिया न झालेल्यांमध्ये जनुकातील गुणविस्तार आढळून आला नाही, असे ब्रह्मचारी यांनी सांगितले.

* दिल्ली पुस्तकमेळ्याच्या केंद्रस्थानी 'पाकिस्तान

पाकिस्तानशी साहित्यसंबंध वृद्धिंगत करण्याच्या हेतूने, 'पाकिस्तान' हे दिल्ली सूत्र केंद्रस्थानी ठेवून येथे दहाव्या पुस्तकमेळ्याची सुरुवात झाली.

या वार्षिक पुस्तकमेळ्यात पाकिस्तानातील २० प्रकाशन संस्थांसहित एकूण ८० पाकिस्तानी प्रतिनिधी सहभागी होत आहेत. इंडिया ट्रेड प्रमोशन ऑर्गनायझेशनने (आयटीपीओ) या मेळ्याचे आयोजन केले असून गेल्या वर्षी प्रथमच पाकिस्तानी प्रकाशकांनी या मेळ्यात

भाग घेतला होता. भारतीय वाचकांना पाकिस्तानी पुस्तकांची ओळख होण्यासाठी हे योग्य व्यासपीठ आहे. या पुस्तकांच्या माध्यमातून येथील वाचकांना पाकिस्तानविषयी अधिक माहिती मिळेल, असा आपल्याला विश्वास आहे, असे पाकिस्तानचे भारतातील उच्चायुक्त अझिझ अहमद खान म्हणाले.

पाकिस्तानी पथकाचे नेतृत्व पाकिस्तानातील प्रख्यात कवी डॉ. अहमद फराज यांनी केले. गतवर्षीच्या पुस्तकमेळ्यालाही ते उपस्थित होते. गेल्या वर्षी मिळालेल्या प्रतिसादामुळे आम्ही भारावून गेलो होतो. दोन देशांना जवळ आणण्यासाठी पुस्तके व प्रकाशक किती महत्त्वाचे काम करू शकतात, याची आम्हाला त्यावेळी प्रथम जाणीव झाली, असे डॉ. फराज म्हणाले.

पुढील वर्षी लाहोर येथे होणाऱ्या पुस्तकमेळ्यात सहभागी होण्यासाठी भारतीय प्रकाशकांना निमंत्रण देण्यात येईल, असेही फराज यांनी सांगितले.

पाकिस्तानखेरीज इराण व युरोपियन महासंघाचेही स्टॉल या मेळ्यात आहेत. यंदा प्रकाशकांकडून मिळणाऱ्या प्रतिसादात वाढ झाली असून यंदा ३०० प्रकाशकांनी यात भाग घेतला आहे. गतवर्षी हीच संख्या १७० होती.

प्रगती मैदानावरील या मेळ्याचे उद्घाटन केंद्रीय वाणिज्य राज्यमंत्री ई. व्ही. के. एस. एलांगोवन यांनी केले. प्रकाशन क्षेत्रात भारत पहिल्या सहा देशांत असून गतवर्षी तब्बल ४.३ अब्ज डॉलरची पुस्तके निर्यात करण्यात आली, असे ते म्हणाले.

या वर्षीच्या मेळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे 'एज्युकेशन ॲण्ड जॉब फेअर'. त्याचीही सुरुवात शनिवारीच झाली. ८० हून अधिक कंपन्या नोकरीसाठी उत्सुक उमेदवारांच्या मुलाखती घेत होत्या, अशी माहिती आयटीपीओचे महाव्यवस्थापक सफदर एच. खान यांनी दिली.

*** प्राण्यांपेक्षा मनुष्यस्वभाव वेगळा नाही!**

माणसाची अनेक रुपे आहेत. ती विविध प्रकारे समोर येतात. मेंदू आणि बुद्धीमुळे वेगळे आहोत, असे समजणारा माणूस प्रत्यक्षात मात्र इतर प्राण्यांपेक्षा वेगळा नाही. त्यामुळे प्राण्यांमधील काही गुणदोष त्याच्यात असणे स्वाभाविकच आहे, असे मत ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर यांनी व्यक्त केले.

'अक्षर मानव संघटना आणि मासिक श्री व सौ'तर्फे आयोजित 'तेंडुलकर काय म्हणतात?' या कार्यक्रमात ते बोलत होते. अवधूत परळकर, रेखा साने-इनामदार, भारत सासणे आणि प्रवीण भोळे यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

जीवसृष्टीतील इतर प्राणीमात्रांपेक्षा माणूस हुशार असल्याच्या अनेक भ्रामक कल्पना पसरलेल्या आहेत. मात्र, मेंदू नसलेल्या प्राण्यांसारखे माणसाचे वागणे पाहिले की, तो अजून आदीअवस्थेतच आहे, असे वाटते. त्याच्यातील स्वभावास तंत्रविज्ञानाची जोड मिळाल्याने माणसाचे सध्याचे वागणे अधिकच धोकादायक बनले असल्याचेही त्यांनी सांगितले.

घरी असलेल्या साहित्यिक वातावरणाचे संस्कार माझ्यावर लहानपणापासूनच नकळत होत राहिले. त्यातच सातवीत शाळा सोडल्यानंतर माझा घरच्यांशी होणारा संवाद पूर्णपणे

थांबला. त्या एकटेपणातून संवाद शोधण्यासाठी लिखाणाचे माध्यम उपयोगी पडले, असे ते म्हणाले. अनेकदा आपण माणसांमध्ये असूनही एकटेच असतो. अशावेळी होणारा आनंद, त्रास, दु:ख अशा भावना लेखनातून व्यक्त करू शकलो. त्यामुळे लिहण्यासाठी जगलो अन् जगण्यासाठी लिहित गेलो, असेही त्यांनी सांगितले.

*** अरुण गोडबोले समर्थांचे चालते बोलते भाष्यकार - प्रा. भोसले**

'राखीव बहुतांची अंतरे'जपणारे अरुण गोडबोले हे समर्थांचे चालते बोलते भाष्यकार आहेत, असे प्रतिपादन मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी केले.

प्रसिद्ध कर सल्लागार व चित्रपट निर्माते अरुण गोडबोले यांच्या षष्ट्यब्दीपूर्ती निमित्त शाहू कला मंदिर सातारा येथे आयोजित केलेल्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य भोसले बोलत होते. व्यासपीठावर सहकारमंत्री विलासराव पाटील-उंडाळकर, नगराध्यक्षा सौ. रंजना रावत, ज्येष्ठ संगीतकार अनिल मोहिले, पं. प्रभाकर कारेकर, सौ. अनुपमा गोडबोले, शिवेंद्रसिंहराजे भोसले उपस्थित होते.

अरुण गोडबोले यांचा सत्कार केल्यानंतर प्राचार्य भोसले आपल्या भाषणात म्हणाले की चालणे, बोलणे, वागणे यात संवाद असावा. माणसे जोडणे, त्यांची मने राखणे दिवसेंदिवस कमी होत असताना गोडबोले यांनी ते साध्य केले आहे. समर्थांच्या मोजक्या अभ्यासकांत त्यांचा अग्रक्रम लागतो. ते चांगले वाचक व लेखक आहेत. दासबोध बारकाईने समजून घेणारे ते अभ्यासक आहेत.

कर सल्लागाराचा व्यवसाय नेकीने करून समाज ऋणाची कल्पना उराशी बाळगून सर्व क्षेत्रात वावरून जगातील माणसासाठी त्यांची धडपड चालू असते.

राजकारण्यांमुळे सज्जन दुबळे होत आहेत. सज्जनांची ही दुर्बलता दूर झाली पाहिजे. त्यासाठी त्यांनी मूल्यांचा लढा दिला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करून प्राचार्य भोसले म्हणाले की, या लढ्यातील सेनापती म्हणून त्यांची नोंद राहील. समाजशीलता वाढेल, लोक एकत्र येतील यासाठी विविध उपक्रम पार पडले पाहिजेत.

विलासराव पाटील उंडाळकर अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, अरुण गोडबोले साहित्य, कला, संस्कृती क्षेत्रातील चालते बोलते विद्यापीठ आहे. स्वातंत्र्यानंतरच्या बदलांचे विविध धागे त्यांच्या रूपाने प्रकट होताना दिसत आहेत. आपला व्यवसाय सांभाळून शहरातील मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्रात नवनवीन उपक्रम ते पार पाडत असतात.

सध्या सर्वधर्मसमभाव, सौहार्द जोपासण्याची अत्यंत आवश्यकता आहे. अरुण गोडबोले यांनी सर्व जाती-धर्मातील मित्रपरिवार जोडला आहे. सर्वधर्मसमभावाचे जीवनात आचारण करणे व माणसांची मने जोडणे यात त्यांना यश आले आहे. गौरव समितीचे कार्यवाह शरद पळणीटकर, नगराध्यक्षा सौ. रंजना रावत, मारुतीबुवा रामदासी, जनता बँकेचे अध्यक्ष गुलाबभाई बागवान, पंडित प्रभाकर कारेकर, संगीतकार अनिल मोहिले, चित्रपट अभिनेते राहुल सोलापूरकर, यांची श्री. गोडबोले यांच्या गौरवार्थ भाषणे झाली.

प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांनी आपल्या खुमासदार शैलीत सूत्रसंचालन केले. 'ऋणानुबंध' या गौरव ग्रंथाचे व अरुण गोडबोले यांच्या पत्नी अनुपमा गोडबोले यांच्या

'तरीही चकोर अनन्य' या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य शिवाजीराव भोसले व विलासराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी स्वरालय पुणे प्रस्तुत सुमधुर मराठी गीतांचा 'भावरंग' कार्यक्रम विभावरी आपटे, जयदीप ढमढेरे यांनी सादर केला.

* निवेदकांनी सादरीकरणात विविध गोष्टींचे भान ठेवावे - अमीन सयानी

''आपल्या मनातील भाव, विचार, कल्पना श्रोत्यांपर्यंत पोहोचविण्याची कला म्हणजे सूत्रसंचालन होय,'' असे विचार ख्यातनाम निवेदक अमीन सयानी यांनी व्यक्त केले.

आकाशवाणीवरील 'बीनाका गीतमाला' या गाजलेल्या कार्यक्रमातून आपल्या निवेदनाद्वारे अनेक रसिकांना भुरळ पाडणाऱ्या अमीन सयानी यांच्या आवाजाने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात जमलेल्या अनेक रसिकांना पुन्हा भुतकाळात नेले. रुग्णालयातील भारतीय ध्वनी वर्ण विज्ञान संस्थेतर्फे सयानी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी सयानी यांनी आकाशवाणीतील आपल्या कामाचा अनुभव सांगतानाच आपल्या आवाजाची निगा कशी राखावी याबद्दलही मार्गदर्शन केले.

निवेदकांनी सादरीकरणात विविध गोष्टींचे भान ठेवणे आवश्यक असल्याचे सांगून म्हणाले, ''आपण काय बोलत आहोत याचे निवेदकाला पूर्ण भान असणे गरजेचे आहे. निवेदकाने कल्पनाशक्तीच्या आधारे संपूर्ण चित्र श्रोत्यांच्या डोळ्यासमोर उभे करणे गरजेचे आहे. यासाठी सोप्या भाषेचा वापर करावा जेणेकरून सामान्य श्रोत्यालाही ती समजेल. परंतु, अशी भाषा वापरताना त्यामध्ये अश्लिलतेचा लवलेश नसावा, हे सांगताना त्यांनी पु. ल. देशपांडे यांचे उदाहरण दिले. ''पु. ल. देशपांडे मला गुरुस्थानी होते. कारण त्यांचे नाटकाचे सादरीकरण उत्तम पद्धतीचे होते,''अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. आपल्या कारकिर्दीत किशोर कुमार यांची घेतलेली मुलाखत हा सर्वोच्च क्षण असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद देशमुख यांनी केले.

* 'जुलूस'च्या अनुभूतीने रसिक चिंब

'त्या' प्रयोगाला आज वातानुकूलित नाट्यगृह नव्हते... नेपथ्य, वेशभूषा आणि प्रकाश योजनाही नव्हती... कलाकारही 'मेकअप' करून आलेले नव्हते... आणि तरीही आभाळाच्या छताखाली, भर पावसात हा प्रयोग विलक्षण रंगला आणि या प्रयोगाचा शेवटही तितकाच नाट्यमय झाला.

एस. एम. जोशी फाउंडेशनमधील खुल्या रंगमंचावर हा आगळावेगळा प्रयोग सादर झाला. 'जागर' संस्थेच्या कलावंतांनी मोठ्या ताकदीने हा प्रयोग रंगवला आणि प्रेक्षकांना वेगळीच अनुभूती त्यातून मिळाली. बादल सरकार यांच्या 'जुलूस' या नाटकाचा हा प्रयोग पाहण्यासाठी भर पावसातही प्रेक्षकांनी गर्दी केली होती.

या प्रयोगाचा शेवटही तितकाच नाट्यमय आणि संस्मरणीय झाला. भारतीय रंगभूमीवर स्वत:चा असा वेगळा ठसा उमटविणारे नाटककार बादलदा अगदी नाटक संपताना प्रयोगाच्या जागी आले. आणि त्यांची ही 'एन्ट्री' प्रेक्षकांना आणि कलावंतांनाही स्तंभित करून गेली. थेट प्रेक्षकांच्या मध्ये येऊन बसलेल्या बादलदांनी नाटक कसे वाटले, असे विचारल्यानंतर प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात पावती दिली.

* चिंचवडमधील चापेकर स्मारकात क्रांतिकारकांच्या शौर्याची गाथा

चिंचवडगावात उभारण्यात येणाऱ्या क्रांतिवीर चापेकरांच्या स्मारकामध्ये सुमारे साडेतीनशे क्रांतिकारकांची सचित्र माहिती असणाऱ्या दालनाचा समावेश करण्यात येणार आहे, अशी माहिती स्मारक समितीचे प्रमुख गिरीश प्रभुणे यांनी दिली. क्रांतिकारकांच्या दालनामध्ये क्रांतिवीर उमाजी नाईक यांच्यापासून पुढे विविध क्रांतिकारकांच्या माहितीचा समावेश असणार आहे. स्मारकासाठी चापेकरांचे नातेवाईक त्यांच्याकडील काही साहित्यही देणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाजी महाराजांची माहिती असलेल्या स्वतंत्र दालनाचाही स्मारकात समावेश करण्यात येणार असल्याचे प्रभुणे यांनी सांगितले.

स्मारकाच्या पहिल्या टप्प्यातील बांधकामात पूर्वीच्या वाड्याप्रमाणे अंतर्गत सजावट करण्यात येत आहे. पालिकेबरोबरच इतर ठिकाणाहूनही या ऐतिहासिक स्मारकाच्या निर्मितीसाठी सहकार्य करण्यात येणार आहे.

* सांस्कृतिक विचार मंथनाचे दरवाजे खुले व्हावेत - रा. ग. जाधव

समाजाला स्वतंत्र विचार करायला लावणे गरजेचे असून सांस्कृतिक विचार मंथनाचे बंद दरवाजे खुले होणे आवश्यक असल्याचे मत ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.

साप्ताहिक साधनाच्या वतीने, परिवर्तनवादी विचार सहयोग केंद्राचे उद्घाटन महापौर दीप्ती चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

प्रख्यात अभिनेते निळू फुले, साप्ताहिक साधनाचे संपादक नरेंद्र दाभोळकर हे या प्रसंगी उपस्थित होते.

जाधव म्हणाले की, समाजाच्या वेगवेगळ्या गटात अडकलेला लहानसा वर्ग समाजाच्या निकोपतेला घातक असून आज सांस्कृतिक विचार मंथनाची गरज आहे. समाजाचे कोणतेही प्रश्न सोडविण्यासाठी घटना यथार्थपणे समजून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी समाजातील सर्व विचारवंतांनी एकत्र आले पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

निळू फुले यांनी, योग्य-अयोग्याचा सारासार विचार करून संवादाच्या माध्यमातून समाजातील दरी कमी केली पाहिजे, असे मत व्यक्त केले.

महापौर चौधरी यांनीही विचार व्यक्त केले. दाभोळकर यांनी प्रास्ताविकात धार्मिक द्वेषभावना घालविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली.

* 'रोशन तुम्हीसे दुनिया' पुस्तकाचे प्रकाशन

नव्या दमाच्या संगीतकारांनी आत्मविश्वासाने काम करावे आणि कायम मोठ्याचा सन्मान करावा असा सल्ला ज्येष्ठ संगीतकार प्यारेलाल शर्मा यांनी दिला.

सिनेपत्रकार सुभाषचंद्र जाधव यांनी लिहिलेल्या 'रोशन तुम्हीसे दुनिया' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी प्यारेलाल यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला ज्येष्ठ विनोदी अभिनेते देवेन वर्मा, संगीतकार आनंद मोडक, संगीत संयोजक श्यामराव कांबळे, इक्बाल दरबार, पत्रकार अरुण खोरे, टेल्कोचे वरिष्ठ अधिकारी सुहास राजे उपस्थित होते.

या पुस्तकात ज्येष्ठ संगीतकार इक्बाल कुरेशी, हसरत जयपुरी, गणेश, कल्याणजी-

आनंदजी,खय्याम यांच्या मुलाखती असल्याचे पुस्तकाचे लेखक सुभाषचंद्र जाधव यांनी सांगितले.

* सुरांमधून मांडले जाणारे विचारही मौलिक - गंगाधर महांबरे

चांगल्या गीतांचे कार्यक्रम आपण आवूर्जन ऐकले पाहिजेत. शाश्वत विचारांइतकेच संगीताच्या सुरांमधून मांडले जाणारे विचारही मौलिक असतात, असे मत ज्येष्ठ कवी गंगाधर महाम्बरे यांनी व्यक्त केले.

अनंतरंग आर्ट फाऊण्डेशनच्यावतीने कवी महाम्बरे यांच्या हस्ते गायक प्रभाकर करंदीकर, गायिका अश्विनी टिळक यांना स्वर्गीय विश्वजित भिडे स्मृती कलाप्रदान पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ गायक पं. मोहनराव कर्वे, संगीतकार मधुसूदन कुलकर्णी, ज्येष्ठ साहित्यिक म. श्री. दीक्षित, गायक मुकुंदराज गोडबोले, नगरसेविका शुभदा जोशी आदी उपस्थित होते.

संगीतक्षेत्रात मिळणाऱ्या या पुरस्काराची किंमत 'नाणेबाजारात'मोजायची नसते असे सांगून ते म्हणाले की, ही किंमत आपण 'गाणेबाजारात' मोजायची असते. शाश्वत विचारांइतकेच संगीताच्या सुरांतून मांडले जाणारे विचारही मोलाचे असतात. दुःख प्रत्येकालाच असते. परंतु संतांच्या शाश्वत विचारांनुसार प्रत्येक क्षण आनंदात घालवल्यास माणूस सुखी होईल. प्रत्येकानेच चांगले संगीत ऐकले पाहिजे. 'कानसेन' होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कलावंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप पुरस्काराच्या माध्यमातून करणे ही चांगली परंपरा असून पुढेही ती अशीच सुरू ठेवावी अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

याप्रसंगी पुरस्कारविजेते अश्विनी टिळक आणि प्रभाकर करंदीकर यांनी नाट्यसंगीताचे सादरीकरण केले.

* 'पुणे बुक फेअर'चे २४ नोव्हेंबर रोजी उद्घाटन

वाचन संस्कृती जोपासण्यासाठी 'पुणे बुक फेअर' हे सर्वात मोठे ग्रंथ आणि शिक्षण प्रदर्शन २४ ते २८ नोव्हेंबर दरम्यान न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथे आयोजित करण्यात येणार आहे.

पुणे पुस्तक विक्रेता संघ, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे बुक सेलर्स, डिस्ट्रीब्युटर्स अँड सप्लायर्स असोसिएशन, बंगाली संसद, पुणे गोवा इन्स्टिट्यूट, आंध्र असोसिएशन आणि कन्नड संघ यांच्या सहकार्याने हे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे.

या प्रदर्शनामध्ये विक्रेते, वितरक, प्रकाशन संस्था, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस आणि ग्रंथालये सहभागी होणार असून, गोवा विभागावरील स्वतंत्र दालन या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य ठरेल. प्रदर्शनात जर्मन, फ्रेंच, चायनीज आणि जपानी या परदेशी भाषांच्या स्वतंत्र विभागात वाचकांना अनेक दुर्मिळ पुस्तके बघायला मिळतील. अंधांसाठी ब्रेल लिपीतील पुस्तके या प्रदर्शनात प्रथमच उपलब्ध होणार आहेत.

* आता पुस्तकरुपात वाचा; 'आम्ही गोंधळी गोंधळी'

आजच्या आधुनिकतेमध्ये अनेक पारंपरिक मौखिक लोककला लोप पावत चालल्या आहेत. त्यातीलच एक महाराष्ट्राची लाडकी लोककला म्हणजे 'गोंधळ'! पण आता 'गोंधळ' या कलेचा अभ्यास करू इच्छिणाऱ्यांसाठी गोंधळाची उत्पत्ती, रचना, त्यावर संतांनी केलेली रुपके आदींची समग्र माहिती संहितेच्या स्वरुपात संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांच्या समर्थ लेखणीतून साकारत आहे.

काळाच्या ओघात ही कला लोप पावत असल्यानेच ती समाजासमोर ग्रंथरुपात मांडत असल्याचे डॉ. देखणे यांनी सांगितले. गोंधळ या मौखिक कलेची संहिता नसल्यामुळे ती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. येथून पुढच्या पिढीला या परंपरेची समग्र माहिती संशोधनाच्या आणि अविष्काराच्या अंगाने ज्ञात व्हावी यासाठीच त्यांनी हा प्रकल्प हाती घेतला आहे.

या अडीचशे पानी पुस्तकात सुरुवातीला गोंधळाची परंपरा, स्वरूप, अविष्कार आणि आदीशक्ती देवीची पीठे आदींची माहिती देण्यात आली आहे. संशोधनातून अनेक आश्चर्यकारक बाबी पुढे आल्या असल्याचे डॉ. देखणे यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या कूळधर्मातील म्हणजेच ज्यांच्या नावाने गोंधळ घातला जातो अशा ५१ शक्तीपीठांपैकी केवळ साडेतीन पीठे महाराष्ट्रात असून अन्य पीठे पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, तिबेट आणि नेपाळ येथे आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करताना गोंधळींना सहभागी करून घेतले होते आणि ही कला कीर्तनाएवढीच प्रभावी असल्याचा उल्लेख जुन्या संत वाङ्मयामध्ये आढळला. एवढेच नव्हे तर संतांनीही गोंधळावर रचना केल्या आहेत.

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत गोंधळाचे व्यावसायिकरण झाले आहे. त्यामुळे वैदिक परंपरेप्रमाणे या कलेचे जतन केले गेले नाही. परिणामी या कलावंतांची शेवटची पिढी उरली आहे. पुढची पिढी या कलेचे जतन करतील की नाही याची शाश्वती नाही. यामुळेच या कलेचे जतन होणे आवश्यक आहे.

भविष्यात ही कला अभ्यासक्रमात समाविष्ट करायची झाल्यास या पुस्तकाचा उपयोग होईल अशीच पुस्तकाची रचना असल्याचे डॉ. देखणे यांनी सांगितले.

* शिक्षणातून शांततेचे उपासक तयार होतील

''सध्याच्या शिक्षणातून फक्त स्पर्धा, विषमता निर्माण होते. महात्मा गांधी यांना अभिप्रेत असलेले शिक्षण विद्यार्थ्यांना दिल्यास त्यातून शांततेचे उपासक निर्माण होतील,'' असा आशावाद पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांनी व्यक्त केला.

'गांधी, किंग, इकेदा : ए लिगसी ऑफ बिल्डिंग पीस'या प्रदर्शनाचे पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरातील कलादालनात उद्घाटन झाले. खासदार सुरेश कलमाडी, महापौर दीप्ती चौधरी, सिंबायोसिस अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शां. ब. मुजूमदार, उपकुलगुरू डॉ. माधव तुटाकणे, 'भारत सोका गाकाई'या संस्थेच्या सरचिटणीस नविना रेड्डी, डॉ. ए. औची आणि ललिता दाईकोके या वेळी उपस्थित होते. महात्मा गांधी, मार्टिन ल्युथर किंग आणि डॉ. दाईसाकू इकेदा या तीन द्रष्ट्या नेत्यांच्या जीवनावर आधारित हे प्रदर्शन होते.

या त्रयींच्या तत्त्वज्ञानाचा धागा पकडून डॉ. कोळस्कर म्हणाले, ''सध्याचे शिक्षण एकमेकांवर मात करण्याचे कसब शिकविते. आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यातून

मिळत नाही. खऱ्या शिक्षणातून शाश्वत विकास होतो. असा विकास शांतता निर्माण करतो. जेथे असे शिक्षण दिले जाते तेथे अत्याचार, अन्याय दिसत नाही. गांधी, किंग, इकेदा या तिघांनीही प्रत्येक व्यक्तीतील परिवर्तनाला महत्त्व दिले. आज प्रत्येक माणसाने आणि समाजाने अंतर्मुख होण्याची गरज आहे.''

शिक्षकदिनाच्या दिवशी गांधी, किंग आणि इकेदा या 'शिक्षकां'विषयीचे प्रदर्शन सुरू झाल्याचे औचित्य डॉ. मुजुमदार यांनी नजरेस आणून दिले. डॉ. इकेदा यांना 'सिंबायोसिस'तर्फे सन्माननीय डी.लिट. पदवी देण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी या वेळी केली. डॉ. रामचंद्र भारद्वाज यांनी आभार मानले.

* विद्या प्रतिष्ठान जिल्ह्यात वाचन कक्ष सुरू करणार

केबलच्या वाढत्या आक्रमणामुळे विद्यार्थ्यांमध्ये कमी होत चाललेली वाचनाची सवय वृद्धिंगत व्हावी व वाचनाद्वारे त्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा, यासाठी 'पवार चॅरिटेबल ट्रस्ट' विद्या प्रतिष्ठानच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या मदतीने 'वाचन कक्ष' (रिडिंग क्लब) सुरू करण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड व पुरंदर तालुक्यातील सुमारे दोनशे शाळांतील सुमारे पन्नास हजार विद्यार्थ्यांना हा उपक्रमाचा फायदा होणार आहे. सुप्रिया व सदानंद सुळे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम सुरू होणार आहे.

या संदर्भात डॉ. अमोल गोजे म्हणाले, ''केबलच्या आक्रमणामुळे मुलांची वाचनाची गोडी कमी झाली आहे. ती वाढविणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. विज्ञानापासून ते इतिहासापर्यंत व पर्यावरणापासून ते भूगोलापर्यंत मुलांना त्यांच्या ज्ञानात सर्वांगीण विकास होईल, अशी पुस्तके विनामूल्य उपलब्ध करून दिली जाणार आहेत. इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना पहिल्या टप्प्यात या उपक्रमात समाविष्ट करून घेण्यात येणार आहे. एका कक्षास सुरवातीस पन्नास पुस्तकांचे दोन संच दिले जाणार आहेत.''

या वाचन कक्षाद्वारे पुढील काळात विद्यार्थ्यांच्या स्पर्धा व मेळावे भरविण्याचेही नियोजन असल्याचे डॉ. गोजे यांनी सांगितले.

* युवकांनी प्रतिज्ञापूर्वक जीवनाला आकार द्यावा

युवाशक्तीचा ओघ विधायकतेच्या मार्गावर जाण्याची गरज असून, युवकांनी प्रतिज्ञापूर्वक जीवनाला आकार दिला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी केले.

'इंडस हेल्थ'तर्फे आयोजित 'मराठी पाऊल पडते पुढे' या कार्यक्रमात युवकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. संस्थेचे मार्गदर्शक डॉ. चारुदत्त आपटे, निवृत्त पोलिस सहआयुक्त एम. एस. महेशगौरी, 'एनएसयूआय'चे प्रदेशाध्यक्ष रोहित टिळक आदी या वेळी उपस्थित होते.

प्राचार्य भोसले म्हणाले, ''तरुण पिढी जाणती; परंतु अस्थिर आहे. तिने तत्त्वांशी बांधिलकी मानायला हवी. परिश्रमाच्या बळावर देशाचे, कुटुंबाचे भवितव्य घडवू शकतो, हा आत्मविश्वास हवा. युवकांची महत्त्वाकांक्षा स्वाभाविकपणे प्रकट व्हायला हवी. मराठी पाऊल पडते पुढे असे आपण म्हणतो, पण त्या पावलांत बळ हवे. त्यासाठी व्यसनांच्या आहारी जाऊन चालणार नाही. नोकऱ्या मिळत नाहीत अशी स्थिती असलेल्या सध्याच्या काळात 'इंडस हेल्थ' सारख्या संस्था युवकांना आधार देण्यासाठी निर्माण व्हायला हव्यात.''

डॉ. आपटे यांनी प्रास्ताविक केले. विनोद सातव यांनी सूत्रसंचालन केले.

* मराठी प्रेक्षकांनी चांगल्या कलाकृतींबद्दल अभिमानाने बोलायला हवे

'श्वास'ला मिळालेल्या सर्वोच्च यशाने मराठी चित्रपटांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला असून, आता मराठी प्रेक्षकांनीही मराठीच्या दैन्यावस्थेबद्दलचे गाऱ्हाणे न मांडता मराठीतल्या चांगल्या कलाकृतीबद्दल अभिमानाने बोलायला हवे, अशी अपेक्षा ज्येष्ठ चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक अमोल पालेकर यांनी व्यक्त केली.

'नूमवीय ७५'तर्फे 'श्वास'मधील सर्व कलावंत आणि तंत्रज्ञांचा सत्कार त्यांच्या हस्ते झाल्यावर ते बोलत होते. ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक राम गबाले, प्रसिद्ध अभिनेते माधव वझे, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, ज्येष्ठ रंगकर्मी चित्तरंजन कोल्हटकर, महापौर दीप्ती चौधरी आदी या कार्यक्रमास उपस्थित होते.

काही वर्षांपूर्वीपर्यंत मराठी चित्रपटाबद्दल भरभरून बोलणाऱ्या प्रेक्षकाला सध्या मात्र त्याविषयी भाष्य करताना संकोच वाटतो. या मनोवृत्तीत बदल होणे आवश्यक असून, तशी संधी 'श्वास'ने राष्ट्रपती सुवर्णकमळ पटकावल्याने निर्माण झाली आहे. म्हणूनच, नव्या उमेदीने सुरू झालेल्या या वाटचालीत प्रेक्षकांचा पाठिंब्यावर मराठी चित्रसृष्टीत पुन्हा आश्वासक पहाट उजाडेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

एकाच ध्येयप्राप्तीसाठी दोन वेगवेगळ्या मार्गाने प्रवास सुरू असला तरीही दिशा नक्की झाल्यावर त्यातील स्पर्धा संपते. एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे, अडखळत्या परिस्थितीत धीर देणे, हे कर्तव्य बनते. त्यामुळे सर्वोत्कृष्ट कलाकृतीबद्दल 'श्वास'ला गौरवले जाताना मनात केवळ कौतुकाची निर्मळ भावना असते, असेही पालेकर यांनी स्पष्ट केले.

प्रत्येक पिढीत एक निराळीच शक्ती असते. केवळ अंत:प्रेरणेच्या आधारावर एखादी कलाकृती निर्माण करणे हे कष्टसाध्य असते. मात्र, मनाला जे भावते ते करून दाखवण्याची जिद्द दाखवल्यानेच 'श्वास'ला यशाच्या शिखरापर्यंत पोहोचता आले. आंतरराष्ट्रीय स्तरावरही चित्रपटाला याच तोडीचे यश लाभेल, असा विश्वास ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक राम गबाले यांनी व्यक्त केला.

मनोरंजनाच्या साचेबद्ध भिंती तोडून दाखवणारा चित्रपट करण्याचे समाधान मिळत आहे असे सांगून गाणी, मिमिक्री, सासु-सूनेचे भांडण असले म्हणजेच चित्रपट चालतो हा समज 'श्वास'ने खोटा ठरवला असल्याचे अभिनेते अरूण नलावडे यांनी सांगितले. या सर्व गोष्टींचा अभाव असूनही चित्रपट नुसता यशस्वी होत नाही, तर पैसेही मिळवून देऊ शकतो, ही धारणाही 'श्वास'मुळे स्पष्ट होण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

* संक्रमणावस्थेत टिकणाऱ्या वृत्तपत्रांनाच भवितव्य

आजच्या संक्रमणावस्थेतून यशस्वीपणे बाहेर पडणारी वृत्तपत्रेच भविष्यात टिकतील. त्याचबरोबर मराठी भाषेच्या अस्तित्वावरही मराठी वृत्तपत्रांचे भवितव्य अवलंबून आहे, असे मत 'सकाळ'चे संचालक संपादक डॉ. अरुण टिकेकर यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ पत्रकार आणि सांगलीचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष बापूसाहेब दप्तरदार

यांच्या जन्मशताब्दी समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी सांगलीचे महापौर किशोर शहा होते. श्री. टिकेकर म्हणाले, ''आज वृत्तपत्रांसमोर आर्थिक स्थैर्याबरोबरच विश्वासार्हताही टिकवण्याचे आव्हान आहे. या क्षेत्रातील स्पर्धा जीवघेणी झाली आहे. काही मोजके वृत्तपत्रसमूह वगळता अन्य सर्व वृत्तपत्रे तोट्यात आहेत. मालक, जाहिरातदार आणि वाचक यांच्या वाढत्या अपेक्षांमध्ये संपादकांना त्यांचे स्वातंत्र्य सांभाळावे लागते आहे. वाचकांचे विविध गट तयार झाले आहेत. त्यांच्या अपेक्षा वाढत आहेत. ते जागृत झाले आहेत. संपादकांची तयार उत्तरे ऐकायला वाचक आता तयार नाहीत.''

''आजची वृत्तपत्रकारिता संक्रमणावस्थेत आहे; मात्र दूरचित्रवाहिन्यांच्या मर्यादा लक्षात घेतल्या, तर त्यांची भीती वृत्तपत्रांनी बाळगायचे कारण नाही,''असे मत व्यक्त करून डॉ. टिकेकर पुढे म्हणाले, वाचकांना आज नवे विषय हवे आहेत. त्यांना जड किंवा बोजड उपदेश नको आहेत; मात्र त्याच वेळी राजकारणापासून वृत्तपत्रांनी समाजकारणाकडे वळले पाहिजे.

जलसंधारणाच्या क्षेत्रात उत्तम काम केल्याबद्दल जिल्हाधिकारी मनीषा म्हैसकर यांचा डॉ. टिकेकर यांच्या हस्ते सत्कार झाला. 'शेतकरीमित्र' पुरस्कार मिळाल्याबद्दल रवींद्र कर्वे, 'दलितमित्र'पुरस्काराबद्दल प्रा. डॉ. सिकंदर जमादार आणि दप्तरदार न्यूज पेपर एजन्सीचे काम अनेक वर्षे करणारे रामभाऊ साळी यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला.

* 'मराठी जगभाषा होण्यासाठी प्रयत्न करावे!'

मराठीविषयीचा न्यूनगंड सोडून तिच्या प्रगतीसाठी सर्वांनी प्रयत्न केला तर मराठी जगभाषा होईल, असे मत माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.

'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत यांच्या ६४व्या जयंतीनिमित्ताने मृत्यंजय प्रतिष्ठानच्यावतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात 'मराठी अक्षर वाङ्मय आणि तरुण पिढी'या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष ग. ना. जोगळेकर, पत्रकार अरविंद गोखले, प्रतिष्ठानच्या संस्थापिका मृणालिनी सावंत, सचिव मिलिंद जोशी, कार्यकारी विश्वस्त सागर देशपांडे उपस्थित होते.

मुंबई पाठोपाठ आता पुण्यातही मराठी भाषा धोक्यात आली असल्याचे सांगून ते म्हणाले की, मराठी माणसालाच मराठी बोलण्यात कमीपणा वाटतो. सध्या पहिलीपासून इंग्रजी सक्तीची आहे. पण मराठी सक्तीची नाही. मराठीसाठी मराठी माणूसच एकत्र येत नाही ही सर्वात मोठी खंत आहे. पण पुढील काळात प्रयत्न केल्यास आपण निश्चित पुढे येऊ शकू. शिवाजी सावंत यांच्याविषयी बोलताना ते म्हणाले की, वयाच्या २७व्या वर्षी त्यांनी जे लिहीले ते कादंबरीचा एक उत्कृष्ट नमुना आहे. असामान्य वाङ्मय हे तरुण असतानाच निर्माण होते.

सावंत यांचे साहित्य लोकांची मने घडवणारे साहित्य आहे, असे मत ग. ना. जोगळेकर यांनी व्यक्त केले. लेखक म्हणून ते लोकप्रिय होतेच पण, माणूस म्हणूनही ते लोकांचे लाडके होते. त्यांनी साहित्यात उभ्या केलेल्या प्रतिमा सर्वांनाच आपल्याशा वाटतात. त्यांचे साहित्य हे वाचकांचे मन काबिज करणारे, त्यांच्यावर अधिराज्य गाजवणारे साहित्य आहे.

* मुलांमधील सुप्त गुण पालकांनी ओळखावेत - किर्लोस्कर

प्रत्येक मुलाला व्यक्तिमत्त्व असते. त्याच्यात गुण असतात. ते गुण ओळखण्याचे काम पालकांनी केले तर मुलांना मोठाच लाभ होईल, असे मत ज्येष्ठ पत्रकार मुकुंदराव किर्लोस्कर यांनी व्यक्त केले.

कै. सौ. कमल जोशी स्मृतिसमारंभात जिव्हाळा पुरस्कार प्रदान करण्यात आले. योवेळी प्रमुख पाहुणे म्हणून किर्लोस्कर बोलत होते. शोभा जोशी यांचीही या वेळी प्रमुख उपस्थिती होती. युवा गायक राहूल देशपांडे याचे वडील विजय देशपांडे आणि नृत्यांगना अमृता जंगम हिची आई वैशाली जंगम यांना या कार्यक्रमात जिव्हाळा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमात किर्लोस्कर यांनी बालसंगोपन आणि मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास या विषयी सविस्तर विवेचन केले. मुलांवर आपला पूर्ण हक्क आहे आणि आपली मुले ही आपली खासगी मालमत्ता आहे, असे पालकांनी समजू नये, मुलांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना विकास पालकांनी केल्यास मुलांवर ते उपकारच ठरतील, असे ते म्हणाले. वैशाली जगम म्हणाल्या की, मला बालपणापासून नृत्याची खूप आवड होती. पण नृत्य शिकण्याची माझी इच्छा काही पूर्ण होऊ शकली नाही. अमृतालाही नृत्याची आवड होती. ती आवड लक्षात घेऊन तिला बालपणापासूनच नृत्याचे शिक्षण घेऊ दिले. विजय देशपांडे यांचेही या वेळी भाषण झाले.

* चांगले वाचक असणाऱ्या समाजात चांगले लेखक निर्माण होतात

''समाजाचा लेखकावर वचक असतो; ज्या समाजात चांगले वाचक असतात त्याच समाजात मोठे लेखकही निर्माण होत असतात,'' असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी केले.

प्रवरानगरला डॉ. धनंजयराव गाडगीळ सभागृहात सहकारमहर्षी पद्मश्री विखे पाटील यांचा १०४ वा जयंती समारंभ व विखे पाटील साहित्य पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित अध्यक्षस्थानी होते. या सोहळ्यास खासदार बाळासाहेब विखे पाटील, अनेक मान्यवर व मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते.

श्री. दीक्षित म्हणाले, ''साहित्यातून जीवनाचे विराट दर्शन अपेक्षित असते. रोजच्या जगण्याच्या पसाऱ्यातच साहित्याचे बीज असते. ऊर्मिला पवार यांचे आयदान म्हणजे उकिरड्यावर चिंध्या सांधणाऱ्या मुलीपासून आंबेडकरी प्रेरणेने विवेकाधिष्ठित जीवन जगणाऱ्या स्त्रीचे जीवन आहे. वेदनेची ही वीज अत्यंत पारदर्शी व प्रवाही आहे. आई होणे म्हणजे काय, या प्रश्नाचे उत्तर विचार करायला लावणारे आहे. सामाजिक कार्यकर्तेपण सांभाळतानाही कोकणातील भाषा परिसर आणि समाजस्थिती ऊर्मिलाताईंनी उत्तम प्रकारे पेलली आहे. संतोष पवार यांनी लिहिलेल्या 'भ्रमिष्टाचा जाहीरनामा' सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर उभा आहे. त्यांनी कवितेचा कस असाच सांभाळला, तर भविष्यात त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळण्याचीही क्षमता आजच्या वाटचालीत दिसते.''

प्रारंभी नेहरू कला अकादमीच्या वतीने पद्मश्री गीत सादर करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पद्मश्रींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचा खासदार विखे, आमदार राधाकृष्ण विखे, माजी आमदार अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी स्मृतिचिन्हे देऊन सत्कार केला. पुरस्कार निवड समितीचे सदस्य रावसाहेब कसबे, गोपाळराव मिरीकर, विजय कसबेकर, डॉ. मेधा काळे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. रावसाहेब कसबे यांनी पुरस्कार देण्यामागची समितीची भूमिका विशद केली.

प्रा. रा. ग. जाधव व अनंत दीक्षित यांच्या हस्ते ऊर्मिला पवार यांना यंदाचा पद्मश्री विखे पाटील साहित्य पुरस्कार (२५ हजार रुपये व स्मृतिचिन्ह) प्रदान करण्यात आला. संतोष पवार, लक्ष्मण महाडिक व शाहीर विठ्ठल उमप यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले.

पुरकार मिळाल्यानंतर मनोगत व्यक्त करताना ऊर्मिला पवार म्हणाल्या, ''स्त्रियांची आत्मकथने ही सरस्वती नदीसारखी आहेत. काही कालखंडात ती पुढे येतात व नंतर लुप्त होतात. मराठीतील स्त्री संतांनी अभंगांतून आपले आत्मकथनच केले आहे. ताराबाई शिंदे, लक्ष्मीबाई टिळक, शांताबाई कांबळे, शांताबाई दाणी यांची चरित्रेही सरस्वती प्रकट होण्यासारखीच आहेत. विखे पाटील पुरस्काराने आज मला मोठा गौरव प्राप्त होत आहे.'' शाहीर विठ्ठल उमप यांनी पद्मश्री विखे पाटील कला गौरव पुरस्कार मिळाल्यानंतर काही प्रसिद्ध रचना सादर करीत श्रोत्यांची मने जिंकली. प्रा. शंकरराव दिघे यांनी सूत्रसंचालन केले. विखे कारखान्याचे अध्यक्ष अणासाहेब कडू यांनी आभार मानले.

* 'स्मृतिचित्रां'तून करा जुन्या पुण्याची सफर...

१९ व्या - २०व्या शतकात देशांतील विविध शहरे, माणसे याबद्दलची सुमारे दोन हजार चित्रकार्डे मुकुंद नवाथे यांनी संग्रहित केली आहेत. त्यांतील काही चित्रकार्डांचे प्रदर्शन पुण्यात बालगंधर्व कलादालनात भरले होते. प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन झाले. खासदार शिवाजीराव आढळराव-पाटील अध्यक्षस्थानी होते. 'सकाळ'चे संचालक-संपादक डॉ. अरुण टिकेकर या वेळी उपस्थित होते.

मुंबई, कोलकता, बनारस, पुणे आदी गावे इथली माणसे १९ व्या-२० व्या शतकात कशी होती, त्यांचे पेहराव, राहणीमान कसे होते हे जाणून घेण्याचे कुतूहल या प्रदर्शनातून पूर्ण होते. नऊवारी साडी नेसून सायकलवरून जाणारी मुंबईतील तरुणी, भोर घाटातून जाणारी रेल्वे, विविध प्रांतांतील वैशिष्ट्यपूर्ण पेहराव केलेल्या स्त्रिया, जगन्नाथ यात्रा, शरीराचा सापळा झालेले दुष्काळग्रस्त; गारुडी, न्हावी, शिंपी आदी व्यावसायिक या चित्रकार्डांतून आपल्याला भेटतात.

श्री. पाटेकर म्हणाले, ''काळाच्या ओघात जे हरवले आहे, ते या प्रदर्शनातून गवसते. जुनी गाणी ऐकताना ज्याप्रमाणे मन त्या काळात जाते, तोच अनुभव हे प्रदर्शन पाहताना येतो.''

डॉ. टिकेकर म्हणाले, ''इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी ही चित्रे महत्त्वाचे साधन आहेत. त्या काळाच्या समाजाचा ठसा या चित्रांत उमटला आहे. त्यामुळे ही चित्रे पुस्तकरूपाने प्रसिद्ध व्हावीत.''

लंडनमध्ये राहूनही श्री. नवाथे यांनी भारतीय संस्कृती, साहित्य जपले असे सांगून श्री. आढळराव म्हणाले, ''पुण्याची संस्कृती, माणसे, इतिहास समजण्यासाठी हे प्रदर्शन खूप महत्त्वाचे आहे.''

मीरा ठकार यांनी सूत्रसंचालन केले. आनंद नवाथे यांनी प्रास्ताविक केले. मुकुंद नवाथे यांनी आभार मानले.

* माहिती तंत्रज्ञानात नेतृत्वासाठी सर्जनशीलता हवी

''माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात बुद्धिमत्तेच्या जोरावर भारत नेतृत्त्व करू शकेल; मात्र त्यासाठी नावीन्याचा ध्यास असलेली सर्जनशीलता युवा पिढीने विकसित केली पाहिजे,''असे मत 'नॅस्कॉम' चे अध्यक्ष किरण कर्णिक यांनी व्यक्त केले.

अमेय प्रकाशनासाठी 'झेन्सार टेक्नॉलॉजीडज'चे उपाध्यक्ष गणेश नटराजन यांनी लिहिलेल्या 'विण्ड्स ऑफ चेंज'चे प्रकाशन करताना श्री. कर्णिक बोलत होते. 'इटीएच रिसर्च लॅब'चे अध्यक्ष डॉ. विजय भटकर, 'डाटाक्वेस्ट'चे संपादक प्रशांतो रॉय, महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत हे प्रमुख वक्ते होते.

श्री. कर्णिक म्हणाले, ''जागतिक स्तरावर देशाची प्रतिमा बदलण्याचे श्रेय माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला जाते. त्यामुळे तरुणांच्या मानसिकतेतही स्वागतार्ह बदल झाले आहेत. जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याइतपत क्षमता त्यांच्यात विकसित झाली आहे. यापुढच्या काळात माहिती तंत्रज्ञानाची सत्ता असेल. त्यामुळे भारताला नेतृत्त्व करण्याची चांगली संधी आहे. त्यासाठी तरुणांनी नावीन्याविषयी उत्सुक असायला हवे. छोटे पाऊल टाका, त्यातूनच मोठी झेप घ्याल, हा मंत्र लक्षात ठेवायला हवा.''

डॉ. भटकर म्हणाले, ''माहिती तंत्रज्ञानाने सर्व क्षेत्रांत महत्त्वाचे बदल झाले आहेत. याचे फायदे लोकांपर्यंत पोचविण्यासाठी शासनाने 'ई गव्हर्नन्स'च्या माध्यमातून पुढाकार घेतला पाहिजे. प्रगतीसाठी योग्य दृष्टी असायला हवी. आपल्याकडे राजीव गांधी यांच्या पुढाकाराने इलेक्ट्रॉनिक्स युग अवतरले. दूरध्वनी संपर्क यंत्रणा विस्तारली. मोबाईल दूरध्वनीची क्रांती झाली. यापुढे विजेचेही बिनतारी वहन करण्यात कुणाला यश आले, तर आश्चर्य वाटायला नको.''

प्रकाशक उल्हास लाटकर यांनी प्रास्ताविक केले. दिलीप आठवले यांनी सूत्रसंचालन केले.

* जगाला आदर्श ठरणारी बौद्धिक परंपरा संस्कृतने निर्माण केली

''जगाला आदर्श ठरेल अशी भव्य बौद्धिक परंपरा संस्कृतने येथे निर्माण केली,'' असे संस्कृतचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. कृष्ण श्रीनिवास अर्जुनवाडकर यांनी सांगितले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते प्रा. अर्जुनवाडकर यांना 'इंदिरा बेहेरे सुवर्णपदक' प्रदान करण्यात आले, त्या वेळी ते बोलत होते. ज्येष्ठ अभ्यासक स. ह. देशपांडे, लीला अर्जुनवाडकर, विद्यापीठाचे संस्कृत विभाग प्रमुख डॉ. श्रीकांत बहुलकर, प्रा. रामभाऊ डिंबळे आदी या वेळी उपस्थित होते.

प्रा. अर्जुनवाडकर म्हणाले, ''उच्च ध्येय बाळगून सातत्याने प्रगत होत राहण्याची ईर्ष्या संस्कृतमुळे इथल्या अभ्यासकांत निर्माण झाली. योग, आयुर्वेद यांचा उगम संस्कृतमध्येच

आहे. त्यामुळे ही भाषा जगभरच्या अभ्यासकांना आकर्षित करून घेत आहे. भारताच्या स्वातंत्र्योत्तर प्रगतीचे कारण पाच हजार वर्षांपासून सगळ्या क्षेत्रांना पायाभूत असलेल्या संस्कृतमध्येच आहे.''

श्री. देशपांडे म्हणाले, ''शास्त्र, व्याकरण व भाषा यांचे स्वरूप निश्चित करणाऱ्या व्याख्या निर्माण करण्याचे पायाभूत कार्य अर्जुनवाडकरांनी केले आहे.''

डॉ. बहुलकर, डॉ. टिळक, सौ. अर्जुनवाडकर, प्रा. डिंबळे यांनीही मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाचे कुलसचिव उमेश केसकर यांनी आभार मानले. शिल्पा सुमंत यांनी सूत्रसंचालन केले.

*** ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी सच्चिदानंद राऊत यांचे निधन**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते आणि ओरिसाचे प्रसिद्ध कवी सच्चिदानंद राऊतराय यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते.

आपल्या ७४ वर्षांच्या प्रदीर्घ साहित्य सेवेत राऊतराय यांचे अनेक काव्यसंग्रह,कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या या साहित्यसेवेबद्दल त्यांना १९८६ मध्ये प्रतिष्ठेचा ज्ञानपीठ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. याशिवाय दैनिकाचे ते कार्यकारी संपादक म्हणून काम पाहत होते.

त्याच्या निधनाचे वृत्त पसरताच अंत्यदर्शनासाठी त्यांच्या चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. राऊतराय यांच्यामागे दोन मुलगे, दोन मुली असा परिवार आहे. ❐

वर्षा योजना

दिपावली म्हणजे दिव्यांची आरास, प्रकाशाचा झगझगाट, मांगल्याची पहाट आणि सुखाची,आनंदाची बरसात. यावेळी प्रत्येकजण एकमेकांवर शुभेच्छा, भेटवस्तुंचा जणू वर्षाव करीत असतो. म्हणूनच खास दिपावली निमित्त ग्राहकांसाठी आम्ही **'वर्षा योजना'** जाहीर करीत आहोत.

या योजनेतून तुम्ही आमच्या प्रकाशनाची कोणतीही आणि कितीही पुस्तके घेऊ शकता **चक्क २५% सवलतीत!**

आमच्या सभासदांसाठी (टी बुक क्लब व मेहता मराठी ग्रंथजगत) या योजनेत आहे खास वाढीव सवलत!

योजनेत सभासदांना सर्व पुस्तके मिळतील **३०% सवलतीत!**

योजनेचा लाभ घेण्यासाठी संपूर्ण सूची मागवा. आणि आपली मागणी मनिऑर्डर/ ड्राफ्टसह नोंदवा. पुस्तके घरपोच हवी असल्यास पाठवण्याचा खर्च पाठवावा.

आमच्या वेबसाईटवरूनही आपण पुस्तकांची निवड व मागणी करू शकता.

मुदत २८ फेब्रुवारी २००५ पर्यंतच!

द गोल्डन रॉन्देव्हू

ॲलिस्टर मॅक्लिन

अनु : अशोक पाध्ये

बोटीवरील अतर्क्य मृत्यू..नाहिसे झालेले संहारक क्षेपणास्त्र..सोने लुटण्यासाठी आखलेला कट...

एका बोटीवर घडलेले थरारक रहस्यमय नाट्य.

ॲलिस्टर मॅक्लिन हे 'इंग्रजी बेस्टसेलर्स'मधील एक अग्रक्रमानं घेतलं जाणारं नाव. त्यांची पुस्तकं प्रचंड गाजली आणि बहुतेक कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले. ते चित्रपट जगभर तुफान चालले. आजही त्या पुस्तकांची, चित्रपटांची लोकप्रियता कमी झालेली नाही. कारण ॲलिस्टर मॅक्लिनच्या कथानकात असलेला सुष्ट आणि दुष्ट यातील सनातन संघर्ष हा वाचकाचा ताबा घेतो. हे तसे नेहमीचेच आहे. परंतु या संघर्षात खलनायकाचे जे रूप मॅक्लिन उभे करतो ते विलक्षण असते. मॅक्लिन यांचा खलनायक हा अत्यंत बुद्धीमान, नियोजनबद्ध कारवाया करणारा आणि अतिशय थंड डोक्याचा असतो. ज्या कौशल्यानं तो कट रचतो व त्याची अंमलबजावणी करतो ते वाचताना वाचकालाही त्यातून कोणताही सुटकेचा मार्ग दिसत नाही आणि मग मॅक्लिनचा नायक, जो खलनायकाच्या चातुर्यावरही मात करू शकणारा असा धारदार बुद्धिमत्तेचा असतो, त्याच्या अनेक उचापती हळूहळू उलगडत जातात. आणि कथेत असे काही गहिरे रंग भरत जातात आणि रहस्याचा लंबक असा काही वेग घेतो की वाचक त्यात भोवंडून जातो. नायक आणि खलनायक यांच्यातील बौद्धिक झुंज हे मॅक्लिन यांच्या कथानकाचे बलस्थान असते. वाचकाला धरून ठेवण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यात आहे म्हणूनच त्यांचे वाङ्मय हे चिरंतन टिकणारे आहे.

ॲलिस्टर मॅक्लिन यांची पुस्तके मराठीत आणून त्यांच्या साहित्यातील थरार मराठी वाचकांपर्यंत पोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न मेहता पब्लिशिंग हाऊस करत आहे. 'फिअर इज द की' व 'द गोल्डन गेट' या दोन पुस्तकांनंतर आता 'द गोल्डन रॉन्देव्हू' हे पुस्तकही मराठी वाचकांसाठी मेहता पब्लिशिंगने सादर केले आहे.

'द गोल्डन रॉन्देव्हू'याचा अर्थ सोनेरी संकेतस्थळ असा आहे. ॲलिस्टर मॅक्लिन यांनी त्यांच्या तरूणपणात नौदलात प्रवेश केला तो काळ दुसऱ्या महायुद्धाच्या आसपासचा होता. ते थोडाच काळ नौदलात होते. परंतु त्या जगाचा त्यांनी इतका बारकाईने अभ्यास

केला होता की त्याचे अनेक बारीक सारीक तपशील त्यांच्या कादंबऱ्यातून आढळतात. या कहाणीत जहाजावरचे जीवन, त्यातील धोके, समुद्रावर अवलंबून असल्यामुळे जीवनाला आलेली अनिश्चतता, जहाजावरील कर्मचाऱ्यांचे परस्पर संबंध याचं चित्र उभं केलं आहे. पुस्तकाच्या सुरवातीलाच खास जहाजावर वापरल्या जाणाऱ्या काही शब्दांचे अर्थ विषद केले आहेत. उदा. ॲफ्ट म्हणजे जहाजाची मागील बाजू किंवा जहाजाची पिछाडी, ब्रिज म्हणजे जिथून जहाज चालवले जाते ती जहाजातील सर्वात उंच असलेली खोली. पर्सर म्हणजे बोटीवरील हिशेब ठेवणारा अधिकारी - वगैरे

संपूर्ण कथानक घडते ते केवळ एक आठवड्यात! एस. एस. कम्पारी ही एक ब्रिटीश काही प्रमाणात मालाची वाहतूक करणारी अलिशान बोट असते. खास करून श्रीमंत आणि उच्चभ्रू वर्गासाठी असलेली ही प्रवासी बोट असते. त्यामुळे या बोटीवर सुखसाधनांची नुसती रेलचेल असे. इथले जेवण इतके स्वादिष्ट असे की केवळ त्यासाठी प्रवाशांनी या बोटीतून प्रवास करावा.

कॅप्टनला संदेश आला---
''डॉ स्लिग्जबी यांचा शोध घ्यावा. तसेच त्या ट्विस्टरचा शोध घ्यावा. पण कोणत्याही परिस्थितीत त्या शस्त्राला अजिबात स्पर्श करू नका.....''

कॅरेबिअन बेटे ते न्यूयॉर्क अशा मार्गाने वाहतूक करणाऱ्या या बोटीचा कॅप्टन ब्युलन हा दणकट शरीराचा, सहा फूट उंचीचा निळ्या डोळ्यांचा वयस्कर कॅप्टन असतो. त्याला दर्यावरचा अफाट अनुभव असतो. बोटीचा चीफ ऑफीसर - कार्टर हा कथानकाचा नायक. संपूर्ण कादंबरी निवेदनाच्या पद्धतीनं पुढे सरकते. नायक स्वत: निवेदन करत आहे. प्रकरणांची नावेही मंगळवार दुपारी १२ ते ५, मंगळवार सकाळ ८ ते रात्री ९.३०, मंगळवार रात्री ९.३० ते १०.१५ याप्रमाणे दिलेली आहेत. यावरून कथानकाच्या वेगाची कल्पना वाचकाला येईल.

एस. एस. कम्पारी बोट जमेका बेटावर येताच तिची कस्टम अधिकाऱ्यांकडून कसून तपासणी होते. कारण कोलंबिया देशातील एका गावात अमेरिकेची एक संशोधन संस्था गुपचूपपणे शस्त्रे विकसित करण्याचे संशोधन करीत होती. तेथे एक छोटा अणुबॉम्ब व क्षेपणास्त्र विकसित केले जात होते. फक्त एक चौरस मैल क्षेत्रफळाची भूमी उध्वस्त करू शकणारा हा अणुबॉम्ब होता. जमिनीवरच्या युद्धाला निर्णायक कलाटणी देऊ शकेल असे हा अणुबॉम्ब होता. आणि तो विकसित करणारा हॉ. स्लिग्जबी कॅरोलिन हा शास्त्रज्ञ त्या अणुबॉम्ब व क्षेपणास्त्रासहीत गायब झालेला होता! हे फारच धक्कादायक होते. त्यासाठी अत्यंत कडक अशी तपासणी सुरू होते.

कम्पारी बोट कॅरॅसिओ बंदरात येते. तिथेही तपासणीला तोंड द्यावे लागल्यामुळे कॅप्टन वैतागलेला असतो या बंदरातून काही पेटारे बोटीवर चढवले जातात. त्यात जनरेटर्स; रेफ्रिजरेटर्स असली यंत्रे असल्याचे सांगितले जाते. आणि तीन कॉफीन्स, व

त्यात तीन अमेरिकनांची प्रेते आहेत, जी न्यूयॉर्कला पोहोचवायची आहेत असे सांगितले जाते व त्यासाठी राजदूताचे पत्र दिले जाते. कॅप्टन ब्युलनला हा माल त्यामुळे स्वीकारावा लागतो.

सततची तपासणी आणि हेड ऑफीसकडून होणारी मानहानी यामुळे कॅप्टन वैतागलेला असतो. त्याच्यावर दडपण आलेले असते. त्यामुळे तो असा माल स्वीकारून व प्रवास सुरू करण्याची घाई करू लागला. याच बंदरातून सिन्योर करेरा हा 'बडा' गृहस्थ बोटीवर पधारतो. तसेच एक अत्यंत वयस्कर अपंग व्यक्ती दोन नर्स सह प्रवेश करते. त्याच्या नर्स या अतीउंच असतात.

बोट आपल्या पोटात यंत्रसामग्री, प्रेते, श्रीमंत व चिडलेले उतारू, धुमसणारा कॅप्टन, चरफडणारा कर्मचारी वर्ग एवढ्या जणांना घेऊन प्रवास करू लागते. आणि काही अतर्क्य घटना बोटीवर घडू लागतात.

बोटीचा चीफ स्ट्यूअर्ड (बोटीवरील प्रवासी व कर्मचारी यांची सेवा करणाऱ्या वर्गाचा प्रमुख) बेन्सन गायब होतो. त्याचा मागमूस लागत नाही तसेच ब्राऊनेल हा प्रमुख वायरलेस ऑपरेटर ही अचानक मरण पावतो. त्या पाठोपाठ थर्ड मेट डेकस्टरही नाहीसा होतो.

अन् पेटाऱ्यातून जी तुमची माणसे तुम्ही कॅरॅसिओ बंदरात बोटीवर चढवलीत ती ट्रोजन हॉर्सची कल्पना कोणाची? तुमच्या वडिलांचीच ना?' कार्टर

सर्वजण चक्रावून जातात. पण काहीच धागादोरा हाती लागत नाही. कार्टर याचा शोध घ्यायचा प्रयत्न करतो. त्याला काही गोष्टी खटकत असतात. त्या अपंग, सेर्डन बद्दल त्याला नेहमीच काहीतरी विचित्र वाटत असते.

याच बोटीतून मिस सुसान बेरिसफोर्ड व तिचे वडील प्रवास करत असतात. ती एक विनयशील; सुंदर तरूणी असते. ती नेहमीच कार्टर यांच्याशी संभाषण करत असते.

कार्टर रात्री शोध घ्यायचा प्रयत्न करतो तर-- तो स्वत:ही जखमी होतो.

या घटनेतील गूढ शोधून काढण्यासाठी कार्टर सुसानला सर्वासाठी एक पार्टी देण्यास लावतो. व त्यावेळात आपले शोधकार्य सुरू करतो. त्याच्या हातात काही धागेदोरे लागतात. आणि त्या पार्टीतच तो त्याचा उच्चार करतो.

आणि त्या क्षणापासून सुरू होते. कार्टर आणि खलनायक याच्यातील झुंज.

दक्षिण अमेरिकेतील एका देशात क्रांती होते पण देशाची तिजोरी रिकामी होते. भूकमोर्चात अनेकजण मृत्यूमुखी पडतात. त्या देशाचा हुकुमशहा पैशासाठी वेडापिसा होतो. पैसा मिळवण्यासाठी तो सोने लुटण्याचा, समुद्रावरील चाचेगिरीची योजना आखतो ही योजना तो अतिशय विचारपूर्वक, थंड डोक्यानं आणि काटेकोर नियोजन बद्धतेनं तयार करतो टिकॉन्डरोगा ही बोट १५ कोटी डॉलर्स किंमतीचे सोने घेऊन प्रवास करीत असते.

ठराविक ठिकाणी टिकॉन्डरोगा बोट येताच तेथे त्यावेळी कम्पारी बोटीसह पोहोचून सोने बुटण्याची ती साहसी कारवाई असते! आणि त्याची जबाबदारी सोपवली जाते. सिन्योर करेरावर! जो नुकताच कम्पारी बोटीवरून प्रवास करत असतो!

कथानकातील रहस्याचा पीळ असा हळू हळू वाढत जातो.

कार्टरच्या रहस्यभेदानंतर करेरा आपलं खरं रूप प्रकट करतो. त्यावेळच्या झटापटीत कार्टरच्या पायात तीन गोळ्या घुसतात व तो जखमी होतो. करेराचे चाळीस हत्यारबंद सहकारी बोटीचा ताबा घेतात. हे सहकारी बंद पेटाऱ्यातून बोटीवर चढवले गेलेले असतात

करेरा बुद्धीमान असतो, त्याच्या सर्व योजना आधीच तयार असतात. कोणती परिस्थिती उद्‌भवेल याचा आधीच विचार करून तो नेहमी तजवीज करत असतो. पण समुद्राचा, बोटीच्या नॅव्हिगेशनचा अनुभव मात्र त्याच्यापाशी नसतो. त्याबाबतीत तो कमकुवत असतो. त्यासाठी त्याला कार्टरची मदत घ्यावी लागत असते. या त्याच्या कमजोरीचा, फायदा घेण्याचे कार्टर ठरवतो आपण जखमी असून कॉटवरून हलू शकत नाही असे चित्र उभे करून आपल्यावर संशय येणार नाही असे वातावरण तयार करतो. व जखमी अवस्थेतच रात्री अत्यंत धोकादायक परिस्थितीतून तो आपले डावपेच रचत जातो.

मी सर्व प्रवाशांचे, कर्मचाऱ्यांचे प्राण वाचवले अन वरती कळस म्हणजे ते १५ कोटी डॉलर्स किंमतीचे सोनेही त्या चाच्यांपासून वाचवले यामुळे कोणीही भारावून जाणे साहजिक होते.

कार्टर नक्की काय करतो? डॉ. स्लिग्जबी कॅरोलिन व त्याचे अणुबॉम्ब व क्षेपणास्त्र कुठे असते? करेरा कम्पारी बोटीवरून टिकॉन्डरोगा बोटीवरील सोने कसे लुटणार असतो? कम्पारीचे काय होते? आणि या सर्व भयचक्रातही कार्टर व सुसान यांचे प्रेमप्रकरण कसे फुलते? यासाठी पुस्तक प्रत्यक्षच वाचायला हवे.

संपूर्ण कथानक हे नायकाच्या तोंडून निवेदनाच्या रूपात समोर येते त्यामुळे नायकाचे प्रत्यक्ष वर्णन कुठेही आढळत नाही. परंतु नायकाचे जे चित्र उभे राहते ते एका सहृदय, नीतीमान आणि प्रसंगावधानी अशा ऑफीसरचे. त्याची तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता व संकटांना न जुमानता बाजी पलटण्यासाठीची विलक्षण बुद्धीमत्ता वाचकाला झपाटून टाकते. खलनायकाचं बुद्धीचातुर्यही वाचकाला चक्रावून टाकते पण तरीही खरा सूत्रधार कुठेही समोर येत नाही. तो अव्यक्त राहतो.

जहाजावरचे जीवन हे किती धोकादायक आणि माणसाच्या शौर्य, बुद्धी, प्रसंगावधान याचा कस लावणारे असते याचे स्पष्ट चित्र ही कादंबरी उभे करते. त्यानं वाचक भारावून जातो. शेवटच्या परिच्छेदापर्यंत रहस्य टिकवून ठेवणारी ही एक उत्तम रहस्यकादंबरी. तिचे स्वागत मराठी वाचक न करतील तरच नवल!

पृष्ठे : ३२० ● किंमत : २०० रु. ● सभासदांना : १४० रु. ● पोस्टेज : २० रु.

प्रियाराधन आणि विवाह

डॉ.विजय नागस्वामी

अनु : भारती पांडे

दाम्पत्यजीवनातील विविध पैलूंची सखोल, परिणामकारक आणि वस्तुनिष्ठ चर्चा



डॉ. विजय नागस्वामी यांच्या 'कोर्टशिप अँड मॅरेज : अ गाईड फॉर इंडियन कपल्स' या अत्यंत उपयुक्त पुस्तकाचा हा मराठी अनुवाद. हे पुस्तक मराठीतून उपलब्ध केल्याबद्दल प्रकाशकांचे आभार मानायला हवेत. सुखी दांपत्यजीवनासाठी नेमक्या कोणत्या प्रकारच्या मानसिक प्रगल्भतेची आवश्यकता असते याचे अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीनं सविस्तर विवेचन या पुस्तकात केलेले आहे. आज स्वशिक्षणाची अनेक पुस्तकं उपलब्ध आहेत. परंतु बहुतेक पुस्तकं ही परदेशी अनुभवांवर आधारलेली असल्यानं भारतीय कुटुंबांना आपल्या समस्या सोडवण्यासाठी त्यांचा फारसा उपयोग होत नाही हे दिसून येते. परंतु या पुस्तकात अतिशय अभ्यासपूर्ण रितीने भारतीय समाजमनातील द्वंद्वे, समस्या मांडल्या आहेत. आणि त्या समस्यांचे निराकरण करण्याचे प्रत्यक्ष ठोकळेबाज उपाय न सुचवता उपाय कसे शोधावे याचे मार्गदर्शन केले आहे. यामुळे भारतीय स्त्रीपुरुषांसाठी हे पुस्तक म्हणजे संसार सुखी करण्याची गीताच ठरेल असे वाटल्याशिवाय राहत नाही.

पाश्चात्य देशांपेक्षा पौर्वात्य देशांत कुटुंबसंस्थेला अजूनही महत्वच आहे. कुटुंबसंस्था हे आजही इथल्या समाजाचं प्राणतत्व आहे. आज जागतिकीकरण, पाश्चात्यांचं अंधानुकरण व चंगळवादाच्या प्रभावामुळं कुटुंबसंस्थेला हादरे बसू लागले आहेत. रोजच्या धकाधकीच्या तणावपूर्ण जीवनशैलीमुळेही पतीपत्नींमधील बेबनाव वाढू लागले आहेत. अशावेळी प्रत्येक मुद्याचा काटेकोर विचार करून हळूहळू उकल करून सांगणारे, वर्तनामागं असणाऱ्या अबोध संवेदनांचा मार्ग दाखवणारे, व मनातील अंत:प्रवाहाचं दर्शन घडवणारं हे पुस्तक अत्यंत महत्वाचं ठरतं.

आज दूरदर्शन व विविध वाहिन्यांवर दाखवल्या जाणाऱ्या कौटुंबिक मालिकांमधून ज्या समस्या दाखवल्या जातात, त्या भडक असल्या तरी संपूर्ण अवास्तव पण नसतात. समाजात कुठे ना कुठे प्रचंड प्रमाणात नसल्या तरी बऱ्यापैकी मोठ्या प्रमाणात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात त्या उद्‌भवलेल्या असतात. 'विवाहबाह्य संबंध' याच विषयावर

बहुतांश मालिका आधारित असतात. या विषयाचं अस्तित्व समाजात हळूहळू वाढत असल्यामुळंच त्याचं प्रतिबिंब या मालिकांमध्ये पडताना दिसतं.

मुळात या समस्या का निर्माण होतात आणि निर्माण झाल्यावर त्यातून बाहेर कसं पडावं याच्या शास्त्रशुद्ध मार्गदर्शनाची सार्वत्रिक गरज आज निर्माण झाली आहे. सततची स्पर्धा, तणाव यामुळे व इतरही अनेक कारणांमुळे माणसाच्या वर्तनरचनेत नव्याने बदल घडत आहेत. पारंपारिक विचारातून बाहेर पडताना नवीन सकस विचार तयार झालेले नाहीत त्यामुळं वैचारिक, भावनिक गोंधळलेपण मोठ्या प्रमाणात निर्माण झाले आहे. यातूनच नात्यातील तुटलेपणा, एकटेपणाची भावना आणि निरस सहजीवन याचा अनुभव अनेक दांपत्यांना आज येत आहे.

या सर्वावर उतारा म्हणजे एका नव्या दृष्टिकोनाची, सकारात्मक शास्त्रशुद्ध उपायांची कास धरणे होय. अशा नव्या दृष्टिकोनातून अत्यंत प्रगल्भ असे मार्गदर्शन हे पुस्तक करते. म्हणूनच याचे महत्व सर्वाधिक आहे. नवीन लग्न झालेले असो अथवा कोणत्याही वळणावरचे दांपत्यजीवन असो स्वत:च्या समस्या अडचणी, भावनांमागच्या प्रेरणा या पुस्तकातून त्यांना पडताळून पाहता येतील हीच याची सर्वात मोठी उपयुक्त बाजू.

नवीन लग्न झालेले असो अथवा कोणत्याही वळणावरचे दांपत्यजीवन असो स्वतःच्या समस्या अडचणी, भावनांमागच्या प्रेरणा या पुस्तकातून त्यांना पडताळून पाहता येतील

अनेकवेळा आपल्या नातेसंबंधातील गतिमानता समजून न घेताच आपण जगत राहतो आणि मग आपल्याला त्या नातेसंबंधातील जे काही उत्कृष्ट आहे ते कधीच मिळत नाही. आपल्या नातेसंबंधामध्ये काही गोष्टी नकळतच काम करत असतात. या गोष्टींचा वेळीच उलगडा झाला नाही तर आपल्या विकासामध्ये अनुल्लंघनीय अशा अडचणी उभ्या राहू शकतात. आपण त्या गोष्टींचे अस्तित्व मान्य केले पाहिजे आणि त्या नष्ट करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. हे करताना प्रथम स्वत:मधील गुंता सोडवण्यास सुरूवात करावी लागेल. त्यासाठी आपल्याला काही साधने लागतील. या पुस्तकामध्ये तुम्हाला स्वत:ला समर्थ बनवणारी व विकासाच्या मार्गावरील वाटचाल चालू ठेवण्यासाठी आवश्यक असणारी साधने सापडतील. तुमच्या नातेसंबंधात नक्की काय घडते आहे हे समजून घेण्यास हे पुस्तक तुम्हाला मदत करेल.

अस्थिर विवाहांमध्येच समस्या असतात असे नाही तर सर्वच विवाहांमध्ये समस्या असतात. बहुतेकवेळा त्या समस्या सोडवण्याऐवजी दृष्टिआड करण्याकडे आपला कल असतो हे पुस्तक तुम्हाला तुमचा विवाह अधिक समजून घेण्यासाठी आणि त्या नात्यातून अधिक काहीतरी मिळवण्यासाठी विचारपूर्वक काही उपाय सुचवील.

प्रत्येक मुद्दा स्पष्ट करताना दोन प्रतिनिधिक जोडप्यांच्या आयुष्यातील घटना येथे दिल्या आहेत. अंबिका आणि अमर यांचा विवाह जुन्या पद्धतीनं ठरवून झाला आहे तर

माया व मनोज प्रेमात पडून विवाहबद्ध झालेले आहेत. त्यांना आलेल्या अडचणी सोडवताना विविध समस्यांचा विचारांचा ऊहापोह अलगदपणे घडत जातो.

विवाहाचे चार प्रमुख आधारस्तंभ आहेत. हे चारही आधारस्तंभ एक दीर्घ आणि स्थिर नातेसंबंध निर्माण करण्यासाठी एकमेकांच्या सहकार्याने काम करत असतात. हे चार आधारस्तंभ म्हणजे प्रेम, आदर, विश्वास आणि आत्यंतिक जवळिक.

या नातेसंबंधातील दोन्ही व्यक्तींना हे आधारस्तंभ बांधावे लागतात. मजबूत करावे लागतात. आणि तरीही हे स्तंभ उभारण्याच्या या दोघांच्या प्रयत्नामध्ये अजाणताच काही गोष्टी अडथळा आणतात. या अडथळा आणणाऱ्या गोष्टी नीट समजून घेतल्या पाहिजेत.

प्रेम : विवाहाचा पहिला आधारस्तंभ

प्रेमाची व्याख्या करण्यापेक्षा त्याचा अनुभव घेणे व आस्वाद घेणे अधिक चांगले व स्पष्ट होण्यास सोईस्कर ठरेल. संपूर्ण आयुष्यात जे दोन व्यक्तिंमधील नातेसंबंध टिकवून धरते, ते प्रेम येथे अभिप्रेत आहे.

विवाहाला जेवढा अधिक काळ लोटेल तेवढे जोडीदाराबद्दलचे प्रेमही वाढणारच असे कोणालाही वाटेल. परंतु हे वाढलेले प्रेम त्यांच्या एकमेकांच्या दाट परिचयातून आणि परस्परांच्या सहवासात वाटणारा मोकळेपणा यातून निर्माण झालेले असते. असे प्रेम थोड्या काळात निर्माण व्हायचे असेल येणाऱ्या अडथळ्यांना दूर सारले पाहिजे.

बहुतेक सर्व लोकांची विवाह करण्यामागची एकच अपेक्षा असते. व ती म्हणजे आपल्याला प्रेम हवे आहे आणि प्रेम करवून घ्यायचे आहे.

प्रत्येकाला आपली आपल्या जोडीदाराकडून काय अपेक्षा हे स्पष्टपणे माहित असते. बहुतेक सर्व लोकांची विवाह करण्यामागची एकच अपेक्षा असते. व ती म्हणजे आपल्याला प्रेम हवे आहे आणि प्रेम करवून घ्यायचे आहे. आपले सर्व स्तरावरील सुखदु:ख एकमेकात वाटून घ्यायचे आहे. एक कुटुंब निर्माण करायचे आहे. आणि मैत्रीपूर्ण सहवासामध्ये म्हातारपण गाठायचे आहे.

या अपेक्षा योग्य आहेत. परंतु या शिवाय काही अबोध अपेक्षा असतात की ज्याचे प्रत्यक्ष अस्तित्व आपल्याला जाणवत नाही. परंतु नवेपणाचा जोर कमी झाला की या अपेक्षा मनात अस्वस्थतेची बीजे पेरतात. आणि ही अस्वस्थता जोडीदारावर आरोप करण्यास प्रवृत्त करते. आरोपप्रत्यारोपाच्या गदारोळात नक्की काय घडते आहे हे दोघांनाही नीट कळत नसते. मग दोघेही परस्परांच्या विक्षिप्त सवयींना लक्ष्य बनवतात व परस्परांना दोष देत राहतात.

खरोखरच काय घडत असते? तर दोन्ही व्यक्तींना आता निरपेक्ष प्रेमाची गरज आहे हे जाणवू लागलेले असते. या गरजेची जाणीव होणे त्यामुळे निर्माण झालेली अस्वस्थता बेचैनी ही दोघेही एकमेकांच्या अधिक जवळ आल्याचेच लक्षण असते. आपण जसजसे एकमेकांवर अवलंबून राहू लागतो तस तशा मूलभूत गरजा पृष्ठभागावर येऊ लागतात.

जोपर्यंत आपण आपल्या अबोध मनातील निरपेक्ष प्रेमाची गरज पूर्ण करत नाही तोपर्यंत आपल्याला उच्च स्तरावरील प्रेमाचा लाभ घेता येणार नाही.

आता 'निरपेक्ष प्रेम' म्हणजे काय? निरपेक्ष प्रेमाचे मानसशास्त्रीय मूळ अगदी गर्भावस्थेपर्यंत तुम्हाला घेऊन जाते गर्भावस्थेत तुमच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेली सर्व पोषण द्रव्ये फक्त आईच्या रक्तातून, गर्भजलातून पुरवली जात होती. म्हणजे तुमची निर्मितीच संपूर्ण परावलंबित्व, विश्वास या वातावरणात व आईच्या निरपेक्ष प्रेमाच्या चौकटीमध्ये झालेली आहे तुम्ही तिच्यावर कोणत्याही अटी लादू शकत नव्हता कारण तुम्हाला ती ताकदच नव्हती. तुम्ही संपूर्ण असहाय्य होता. हेच निरपेक्ष प्रेम पुढे आयुष्यभर मिळत राहील अशी तुमची अपेक्षा होती. परंतु हळूहळू आईवडिलांनी अटी घालायला सुरूवात केली.

सर्वसाधारणपणे मुलावर लादल्या गेलेल्या अपेक्षा जेवढ्या कडक तेवढे ते मूल मोठेपणी दडपलेले राहते. पालक लाड करणारे असतील तर मूल अधिक हट्टी होते. आपल्यापैकी बहुतेकजण या दोन टोकाच्या असलेल्या परिस्थितीमध्ये वाढलेले असतो. निरपेक्ष प्रेम आयुष्यभर मिळावे अशी आपली गरज असते ती पुरी न झाल्यामुळे ती समस्या सोडवली गेलेली नसते आणि ती कुमारवयात आणि प्रौढत्वाच्या आरंभी बंड करून उठते.

मी सर्व प्रवाशांचे, कर्मचाऱ्यांचे प्राण वाचवल अन वरती कळस म्हणजे ते १५ कोटी डॉलर्स किंमतीचे सोनेही त्या चाच्यांपासून वाचवले यामुळे कोणीही भारावून जाणे साहजिक होते.

प्रौढपणी आपण ही निरपेक्ष प्रेमाची गरज बाजूला ठेवून इतर गोष्टींना महत्व देतो. व्यवसायातील स्थिरता, आपले छंद, इतर नातेसंबंध याला महत्व देतो. याचवेळी आपण प्रेमात पडतो संसारात पडतो. आपण आपल्या जोडीदारावर अवलंबून राहू लागतो आणि याच वेळी अपूर्ण राहिलेली निरपेक्ष प्रेमाची गरज वर उफाळून येते व ती निरनिराळ्या पद्धतीनं आपले अस्तित्व दाखवू लागते.

अगदी प्राथमिक अवस्थेमध्ये निरपेक्ष प्रेमाची गरज स्पष्ट होते ती रागाच्या झटक्यातून एक व्यक्ती आपल्या जोडीदारावर भयंकर चिडते संतापते. जोडीदार ही त्याला तसेच उत्तर देतो. मग दोघांनाही प्रचंड गळून गेल्यासारखे वाटते. कारण निरपेक्ष प्रेमाची भावना व्यक्त होताना खर्च होणारी उर्जा प्रचंड असते. खालील गोष्टी घडत असतील तर तुम्हाला निरपेक्ष प्रेमाची गरज जाणवू लागली आहे हे समजावे.

* अगदी क्षुल्लक कारणावरून एकमेकांवर रुसणे वाढीस लागणे.
* माझ्या गरजा तुला जाणवेनाश्याच झाल्या आहेत असा आरोप वारंवार करणे.
* दोघांनाही शारीरिक सुखाची आवश्यकता भासत असतानाही त्यापासून वंचित राहणे.
* दुसऱ्याने आपल्या वर्तनामध्ये बदल केला पाहिजे अशी मागणी दोघांनीही करणे.
* गंभीर व लंब्याचवड्या चर्चा - विषय - मी आहे तसा / तशी माझ्यावर प्रेम कर माझ्यावर अटी लादू नकोस.
* दुसऱ्याची मागणी पूर्ण करणे अशक्य आहे असे दोघांनाही वाटणे.
* भांडणातील महत्वाचे वाक्य तुला माझ्याकडून हवंय तरी काय? आणि पोरकटपणानं वागू नकोस
* माझ्यात काय दोष आहे? ती/तो मी आहे तसा/तशी माझ्यावर प्रेम का करू शकत नाही? हा विचार वारंवार मनात येणे.
* मी तुला जे करायला सांगते/सांगतो आहे ते एवढं कठीण आहे का? माझ्यासाठी तू एवढंही करू शकत नाही का? हा प्रश्न वारंवार एकमेकांना विचारणे.
* आपण आपले विचार, भावना प्रकट केल्या तर जोडीदार काय प्रतिसाद देईल याची कल्पना न आल्यामुळे विचार भावना मनातच ठेवणे.
* मित्रांचे जोडीदारही तुमच्या जोडीदारासारखे तापट आहेत का याची चौकशी करणे. इत्यादी.

निरपेक्ष प्रेमाची गरज भासणे हा खरा संघर्ष आहे. हा संघर्ष सोडवण्याची प्रक्रीया इतर कोणत्याही प्रक्रीयेसारखीच आहे. मान्य करणे, समजून घेणे, स्वीकार करणे आणि सोडून देणे यात जोडीदाराच्या व्यक्त अव्यक्त अपेक्षांचे जाणीवपूर्वक आकलन करून घेणे गरजेचे ठरते.

आपला विवाह अर्थपूर्ण बनवायचा असेल तर आपल्या जोडीदारावर संपूर्ण विश्वास ठेवण्यास सुरूवात करावीच लागेल अगदी आपण लहान असताना आपल्या आईवडिलांवर जेवढा विश्वास ठेवत होतात तेवढा विश्वास ठेवावा लागेल.

विश्वास : विवाहाचा दुसरा आधारस्तंभ

विश्वास हा विवाहाचा दुसरा आधारस्तंभ आहे. प्रत्येक नातेसंबंध दीर्घकाळपर्यंत टिकवण्यासाठी एका प्राथमिक विश्वासाची जरूरी असते. प्राथमिक विश्वास म्हणजे आपला जोडीदार आपल्याला फसवणार नाही अशा प्रकारचा अभिप्रेत आहे. एखादा नातेसंबंध दीर्घकाळ टिकवण्यासाठी आणि त्यामुळं जीवन अधिक संपन्न होण्यासाठी एक अधिक वरच्या श्रेणीच्या विश्वासाचा अनुभव येणे आवश्यक असते. विवाहाचा हा दुसरा आधारस्तंभ नीटपणे उभारण्यासाठी तुमची नाळ संपूर्णपणे आणि खरोखर तोडून टाकण्याचे धैर्य असले पाहिजे.

आपला विवाह अर्थपूर्ण बनवायचा असेल तर आपल्या जोडीदारावर संपूर्ण विश्वास ठेवण्यास सुरूवात करावीच लागेल अगदी आपण लहान असताना आपल्या आईवडिलांवर जेवढा विश्वास ठेवत होतात तेवढा विश्वास ठेवावा लागेल.

आपण सर्वचजण एका विलक्षणरितीने आपल्या आईवडिलांच्या वर्तनरचना स्वत:च्या वर्तनामध्ये मिसळून घेत असतो. कारण तो एकच नातेसंबंध आपण जवळून पाहिलेला असतो. आपल्या जोडीदाराशी सर्वार्थाने मनोमिलन होण्यासाठी स्वत:चे स्वतंत्र व्यक्तिमत्व बनवणे नितांत गरजेचे आहे. स्वतंत्र व्यक्तिमत्व बनवणे म्हणजे पालकांनी दिलेल्या व्यक्तिमत्वाहून वेगळी अशी स्वत:ची निजखूण निर्माण करणे.

स्वतंत्र व्यक्तिमत्व बनवण्याची प्रक्रीया काही फारशी सोपी नाही. कारण यामध्ये स्वत:च्या बालपणाचा आणि आईवडिलांचा तटस्थपणे घेतलेला काटेकोर आढावा महत्वाचा असतो. स्वतंत्र व्यक्तीमत्व बनवणे म्हणजे आपल्या आईवडिलांना आपल्या आयुष्यातून हद्दपार करणे नव्हे तर त्यांच्याबरोबर नातेसबंध प्रौढ व्यक्तीच्या पातळीवर नेणे व तेथे टिकवून धरणे आणि त्या नातेसंबंधात गुणात्मक वाढ घडवून आणणे हा त्या प्रक्रियेचा अर्थ आहे.

हे सोपे नाही परंतू तरीही याची आवश्यकता मान्य करणे. एवढेही पतीपत्नींमधील विश्वास वाढीस लावण्यास उपयुक्त ठरते.

आदर : विवाहाचा तिसरा आधारस्तंभ

नातेसंबंधाच्या आरंभापासूनच आदर ही प्राथमिक पायरी असते. परस्परांच्या उत्तम माणूस असण्याला मान्यता दिल्यामुळे जे एक सुखद आणि टिकाऊ परस्पर सामंजस्य निर्माण होते, ते म्हणजे आदर.

एकमेकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी डावपेच खेळले जातात. असे डावपेच असणे म्हणजे खूप काही बिघडले आहे असे नसून दोघांनाही एकमेकात रस आहे असा त्याचा अर्थ होतो.

एकमेकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी डावपेच खेळले जातात. असे डावपेच असणे म्हणजे खूप काही बिघडले आहे असे नसून दोघांनाही एकमेकात रस आहे असा होतो. या नियंत्रणाच्या डावपेचांचे यशस्वी निराकरण झाले म्हणजे खरीखुरी आदरभावना निर्माण होण्यास मदत होते.

नियंत्रण डावपेचांमध्ये सक्रीय नियंत्रण व अक्रीयाशील नियंत्रण असे विभाग पडतात. आपण कोणत्या पद्धतीने व का नियंत्रण डावपेच खेळत आहोत याचे आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे. स्वत:चे मूल्यमापन करणे कठीण असले तरी त्याची आवश्यकता समजून घेतल्यानेच जोडीदाराबद्दलच्या आदराचा स्तर वाढू शकतो. आपण स्वत:ला काही सीमारेषा आखून घेतलेल्या असतात आपला वैवाहिक नातेसंबंध अधिक परिणामकारक करावयाचा असेल तर वैवाहिक जीवनातील सीमारेषा सर्वात अधिक सैल ठेवल्या पाहिजेत. प्राथमिक महत्वाचे कुटुंब, व दुय्यम महत्वाचे कामाच्या ठिकाणी असलेले नातेसंबंध असे ठेवणे महत्वाचे आहे.

जवळीक : विवाहाचा चौथा आधारस्तंभ

स्त्री पुरूष नात्यामधील ही विशिष्ट जवळीक इतर तीनही आधारस्तंभांचे एक सुंदर मिश्रण दर्शवत असते. प्रारंभीच्या काळामध्ये साहजिकच असणारी जवळीक अशी जोपासली गेली पाहिजे की ती अधिक मजबूत आणि सखोल होईल.

नातेसंबंधाच्या संदर्भामध्ये जवळीक म्हणजे व्यक्तीची संपूर्णपणे प्रामाणिक असण्याची, दुसऱ्या व्यक्तीशी निर्मळपणे वागण्याची, स्वत:चे मन उघड करून दाखवण्याची निर्भय व निर्भिड क्षमता.

जवळीक ही दोन व्यक्तीमधील समीपतेची परमावधी आहे. जवळीक म्हणजे स्वत:शी जुळलेला सूर आणि स्वत:च्या हळवेपणाला दिलेली मन:पूर्वक स्वीकृती आहे. जेंव्हा दोन व्यक्ती स्वत:च्या व्यक्तिमत्वाशी तारा जुळवून असतात आणि हे एकमेकांजवळ व्यक्त करू शकतात तेंव्हा खरी जवळीक निर्माण होते.

शृंगार करण्याच्या वेळा-कमी होऊ लागल्या याचा अर्थ तुमची जवळीक कमी झाली असा नसतो कारण जवळीक असणे म्हणजे एकमेकांच्या सहवासात शांत, समाधानी वाटणे, परस्परांचे सूर जुळलेले आहेत हे जाणवणे. तुमचे नाते अधिक सकस बनवण्याचा जेवढा अधिक प्रयत्न तुम्ही कराल तेवढा या वैशिष्ट्यपूर्ण भावनेचा अधिक अनुभव तुम्हाला येईल.

जवळीक निर्माण होण्यातील अडथळे, लैंगिक, शारिरीक समस्या, याबाबत आवश्यक तेवढे सविस्तर विवेचन या पुस्तकात तुम्हाला आढळेल. जवळीकीचा सखोल अर्थ स्वत:च्या आयुष्यात पडताळून पाहणे यामुळे शक्य होईल आणि अबोध मनातील अपेक्षांचे निराकरण झाल्याचे समाधान मिळेल.

जवळीक म्हणजे व्यक्तीची संपूर्णपणे प्रामाणिक असण्याची, दुसऱ्या व्यक्तीशी निर्मळपणे वागण्याची, स्वतःचे मन उघड करून दाखवण्याची निर्भय व निर्भिड क्षमता.

दाम्पत्यजीवनातील विविध पैलूंची अशा प्रकारे अधिक सखोल, परिणामकारक आणि वस्तुनिष्ठ चर्चा या पुस्तकात केली आहे. स्वत:च्या मनाचे, अपेक्षांचे आणि वर्तनाचे पदर स्वत:च उलगडत जाणे सुकर होईल आणि ज्या अनेक छोट्या मोठ्या समस्यांची उत्तरे तुम्हाला मिळत नसतील ती आपोआपच मिळतील अशी खात्री वाटते.

पुस्तकात प्रत्येक मुद्याच्या स्पष्टीकरणासाठी काय करावे याचे सुस्पष्ट विवेचन आहे. उदा.स्वत:च्या भावनिक गरजांशी संपर्क साधण्यासाठी काय करावे हे सांगण्यासाठी खालील मुद्दे दिले आहेत.

* तुमच्या मनाची एक भावनेकडून दुसऱ्या भावनेकडे झुलण्याची शक्ती जाणून घ्या - अस्वस्थतेकडून संतोषाकडे, उदासीनतेकडून उल्हासाकडे, दु:खापासून आनंदाकडे.

* तुमच्या जोडीदाराला तुम्ही काय सांगत आहात ते नीटसे कळत नसावे अशी शंका मनात आली तरी तुमची भावना बोलून दाखवा.

* आपल्या भावनांना वाट करून दिली तर बाहेर पडता येणार नाही अशा दलदलीत रूतून बसू अशी भीती बाळगू नका माणसाचे मन फार चिवट असते.

आयुष्यात समतोल राखण्यासाठी काय करावे याचे रीतसर मार्गदर्शन तुम्हाला वयाच्या कोणत्याही वळणावर उपयुक्त ठरणारे आहे. त्यामुळेच या पुस्तकाची संग्राहकता वाढली आहे हे निश्चित.

पृष्ठे : २१२ ● किंमत : १५० रु. ● सभासदांना : १०५ रु. ● पोस्टेज : २० रु.

फिटे अंधाराचे जाळे

भालचंद्र करमरकर

अंधार झालाय खरा पण सूर्य उजाडू शकतो असा आशावाद जागवणारं पुस्तक

'फिटे अंधाराचे जाळे' पुस्तकाचे लेखक आहेत भालचंद्र करमरकर. त्यांचे लग्न उशिरा झालेलं. अपत्य उशिरा. जे अपत्य पोटी आलं ते पक्षाघाताचा बळी. बहुविकलांग. (Cerebral Plasy). पालक म्हणून भालचंद्र करमरकर व त्यांच्या पत्नी विद्याताई यांच्यावर आकाश कोसळल्यासारखी स्थिती. ते जिद्द हरत नाहीत. आपल्या पोटी आलेल्या वल्लरीचा सांभाळ करायचा व तिला सर्वसाधारण मुला-मुलींसारखं करायचं (Normal) हा ध्यास. दुसरं मूल होऊ द्यायचं नाही असा शहाणपणाचा निर्णय ते घेतात. वैद्यकीय उपचारच प्रमाण मानतात. देवाचे अंगारे-धुपारे न करता विज्ञान व वैद्यकशास्त्राची कास धरतात. वल्लरी हे त्यांच्या कुटुंबाचं एकमात्र लक्ष्यं ठरतं. 'फिटे अंधाराचे जाळे' म्हणजे पदरी आलेल्या बहुविकलांग सुकन्येस सज्ञान, सुजाण, सुशिक्षित करतानाच्या अनंत अनुभवांची प्रांजळ मांडणी. वल्लरी नुकतीच संस्कृत विषयात एम्. ए. झाली. सतत 'रायटर' घेऊन शिकलेली वल्लरी आता स्वहस्ते सी. डी. राईट करू शकते, संगणक हाताळते, प्रिंट काढते, लुनावर बसते (अर्थात बाबांच्या मागे), बोलते (सभेतही!), शिकवते (वर्गात), अन् आता तर चक्क लिहितेही!

हे पुस्तक माणूसपण शिकवणारं पुस्तक होय. ज्यांच्या पोटी अंध, अपंग, मतिमंद अपत्य आलं असेल त्यांना हे पुस्तक उमेद देतं. अंधार झालाय खरा पण सूर्य उजाडू शकतो असा आशावाद जागवणारं हे पुस्तक आहे. हे पुस्तक वाचकांच्या मनात अनेक सामाजिक प्रश्नांचं मोहोळ निर्माण करतं. हे पुस्तक आहे आत्मपरीक्षण करण्याचं. बहुविकलांग वल्लरी, एक मासाचा गोळा होता. भालचंद्र पंत, विद्याताई व वल्लरीची आत्या या 'गुरुत्रयी'नी या गोळ्याला आकार देऊन एक बुद्धिमान, सुजाण, सुकन्या बनवलं. ते बनवताना त्यांना कोणकोणत्या अरिष्टांना, आव्हानांना तोंड द्यावं लागलं, ते वाचत असताना सर्वसामान्य माणसास या कुटुंबाच्या शर्थीचा अचंबा वाटू लागतो व आपल्या किडी-मुंगी सारख्या आयुष्याची खरं तर शरमही दाटून येते.

हे पुस्तक अनेक सामाजिक हक्क व कर्तव्यांचं द्वंद्व निर्माण करत. ज्या मुलांना अपंगत्व आलेलं असतं त्यांना लेखनिक घेऊन परीक्षा देता येते. विद्यार्थी/परीक्षार्थी एकदा अपंग म्हणून नोंदला गेला की, त्याला लेखनिक द्यायची जबाबदारी ही शिक्षण, परीक्षा व्यवस्थेची असायला हवी. त्यासाठी आधीच दुर्बल असलेल्यास खेटे घालण्याची नामुष्की येऊ नये. अन्य मुलांबरोबर न्याय्य स्पर्धा करण्याचा, अधिक नि व्यक्ती गरजेनुसार विशेष सोयी-सुविधा मिळण्याचा अपंग विद्यार्थ्यास हक्क आहे नि त्याची सन्मानजनक पूर्तता करणं हे संबंधित यंत्रणेचे कर्तव्य म्हणून नोंद व्हायची वेळ येऊन ठेपली आहे. भालचंद्र करमरकरांना आपली अपंग मुलगी शिकवती ठेवण्यासाठी शाळा, विद्यापीठ इ. च्या प्रशासन, परीक्षा अधिकाऱ्यांच्या ज्या नाकदुऱ्या काढाव्या लागल्या ते वाचताना हे ठळकपणे रेखांकित होते.

सामान्य विद्यार्थी एका दिवशी दोन प्रश्नपत्रिका सोडवू शकतो. अंध, अपंग, मतिमंद (नि गतिमंदही!) विद्यार्थ्यांना ते अशक्य असतं. परीक्षेचं वेळापत्रक ठरविणाऱ्या शाळा, बोर्ड, विद्यापीठ यांनी याचं भान ठेवलं पाहिजे. असे विद्यार्थी ज्या शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे येथे प्रवेश घेतात तेथील इमारती अपंग सुलभ (उतार, पायऱ्यातील अंतर, संरक्षक व आधार कठडे, प्रसाधन कक्ष वर्ग इ.) असल्या पाहिजेत. त्या 'सार्वजनिक संस्था' या सदरात मोडत असल्यानं अशा इमारतींना परवाने देताना आग्रही राहिलं पाहिजे. जुन्या इमारतीतही या सुविधा करणं अनिवार्य केलं पाहिजे कारण अपंग विद्यार्थ्यांची संख्या विकसित (शायनिंग?) भारतात वाढती आहे. समाजात प्रत्येक अंध, अपंग, मतिमंद, गतिमंद विद्यार्थी पूर्ण पुनर्वसनाचा हक्कदार आहे. त्याला लैंगिक सुख मिळालं पाहिजे. ती त्यांची इतरांप्रमाणेच मूलभूत गरज असते. अपंग मुला-मुलीतही पितृत्व, मातृत्वाची ओढ असते. अशा मुलांना अपत्य जबाबदारी पेलण्यापर्यंत सक्षम करण्याची जबाबदारी पालक, संस्था, शासन, समाजाची आहे याचं भान ठेवण्याची वेळ येऊन ठेपली आहे. 'रोगापेक्षा इलाज भयंकर', न्यायानं अपंग, मतिमंद मुला-मुलींची नसबंदी, गर्भाशय काढणे यासारखे अमानुष उपाय योजले जातात. कारण आपला समाज या प्रश्नासंदर्भात व्हावा तितका भावसाक्षर झालेला नाही. सर्वांना अनिवार्य लैंगिक शिक्षणाचा वस्तुपाठ अंगिकारायची वेळ आली आहे. मध्यंतरी शिरूर येथील शासकीय मतिमंद मुलींच्या वसतिगृहातील एक मुलगी गर्भवती झाली म्हणून उर्वरित सर्वांचे गर्भाशय काढल्याच निदर्शनाला आल्यावरून मोठा गहजब झाला होता. तो योग्यच होता. या पुस्तकातही वल्लरीच्या वाट्यास तीच शिक्षा आल्याचं वाचून अजून अपंगांच्या संदर्भातील अज्ञानाच्या अंधाराचं जाळं फिटलं नसल्याचं प्रकर्षानं लक्षात आलं.

डॉक्टरांनी 'हा एकंदरीत पेशन्सचा मामला आहे' असं म्हटलं आणि तिच्या कुटुंबानं हा 'पेशन्स' अक्षरशः स्वतःत मुरवला.

समाजातील अपंगांच्या शिक्षण, संगोपन, पुनर्वसन क्षेत्रात अंधाराचं जाळं फिटायचं तर हे पुस्तक समाज शिक्षणाचा भाग म्हणून वाचलं गेलं पाहिजे. मुलांनी मागितलं ते दिलं की आपण आपलं पालकत्व निभावलं असा एक गैरसमज व सोयीस्कर आचार धर्म रूढ होतो आहे. मुलांच्या शिक्षण व संगोपनासंदर्भात what they want पेक्षा what they need हे सूत्र पालकांनी लक्षात ठेवलं पाहिजे. ''फिटे अंधाराचे जाळे''हे पुस्तक ही जाण देतं.

वल्लरीचं हे आव्हान करमरकर कुटुंबियांनी कसं पेललं? याचा अगदी ओघवता आणि काय घडलं ते जसं घडलं तसं सांगण्याच्या भूमिकेतून घेतलेला आढावा या पुस्तकात शब्दबद्ध केला आहे.

कहाणी आहे जवळजवळ अडीच तपाची या अडीच तपात वल्लरीच्या आई वडिलांनी व आत्यानं शांतपणे, निश्चित अशा प्रयत्नांची दिशा ठरवली व त्यावरून अत्यंत धीरानं चिकाटीनं, निराश न होता हा प्रयत्नप्रवास आरंभला.

हा ॲटॅक सौम्य आहे म्हणून तिच्यात सुधारणा शक्य आहे. मात्र तुम्हाला त्यासाठी फार अगदी फार फार परिश्रम करावे लागतील आणि खूप कालावधी लागेल. पहा तुम्ही काय करू शकता! मात्र ही मोठी हर्डल रेस आहे.

प्रत्येक गोष्टीत वाट पाहायला लागणाऱ्या करमरकरांना आपल्यासाठीही थोडी वाट पहावी लागली. वल्लरीच्या आईला खूप सोसावं लागलं. प्रसुतीला विलंब होऊ लागला. म्हणून सिझेरियनचा निर्णय घेऊन डॉक्टरांना बोलावलं. पण डॉक्टर येण्यापूर्वीच अडलेली असूनही प्रसूती झाली. पण बाळ रडेचना. बाळावर उपचार सुरू केले. आणि जन्मानंतर अडीच तासानं बाळ रडलं - जन्म घडायला वेळ लागल्यामुळं बाळ घुसमटलं आणि काळंनिळं पडलं होतं. बाळ रडल्यानंतर आईचा जीव भांड्यात पडला. पण यामुळं तिच्या लहान मेंदूवर पक्षाघाताचा आघात झाला आणि ती सेरेब्रल प्लासी या आजाराची शिकार झाली.

डॉक्टरांनी हे सांगताना 'हा एकंदरीत पेशन्सचा मामला आहे' असं म्हटलं आणि तिच्या कुटुंबानं हो 'पेशन्स' अक्षरश: स्वत:त मुरवला.

वल्लरीची सर्वच प्रगती अत्यंत सावकाश होत होती. पालथे पडणे, सरकणे, या क्रिया यायला खूप वेळ लागला. सारखी लाळ गळे. ती गिळता येत नसे. लाळ गळणे थांबेपर्यंत ती पाच वर्षांची झाली!

प्रत्येकच बाबतीत, प्रत्येक हालचालींसाठी खूप सराव करावा लागे. दूध पिणे, औषध पिणे, वगैरे पुढील ट्रीटमेंटसाठी पुणे गाठलं. डॉ. वारीअव्वा यांनी कसून तपासणी केली. आणि अश्वासक धीर दिला. ते म्हणाले,'तुमच्या मुलीला आलेला हा ॲटॅक लहान मेंदूवर आघात करून गेलाय.'त्यामुळं तिला शरीराचा तोल सांभाळणं, अवघड झालय. मोठ्या मेंदूवर झालेल्या आघातात होणारी हानी कधीच न भरून येणारी असते लहान मेंदूवरची हानी भरून निघू शकते. बहुतांश दुरूस्तही होवू शकते. हा ॲटॅक सौम्य आहे म्हणून तिच्यात सुधारणा शक्य आहे. मात्र तुम्हाला त्यासाठी फार अगदी फार फार परिश्रम करावे लागतील आणि खूप कालावधी लागेल. पहा तुम्ही काय करू शकता! मात्र ही मोठी हर्डल रेस आहे. सुदैवानं यशाची शक्यता आहे असा माझा अंदाज आहे.

पुण्याहून परतल्यावर एक मोठा लढा आणि प्रदीर्घकाळ चालवायची मोहीम असं समजून स्वत:च्या जीवनक्रमात बदल करून घेतला-

तिला शिक्षण देण्याचं ठरवल्यावरही अनेक प्रयोग उपक्रम सतत केले. यातून तिची तल्लख बुद्धी, चिकाटी याचं दर्शन घडत गेलं आणि जिद्दीला बळकटी आली.

वल्लरी नेहमीच चांगल्या मार्कानं पास झाली. त्यासाठी तिनं, आणि आईवडील व आत्या यांनी घेतलेले कष्ट हे अपरंपार आहेत. ही प्रयत्नयात्रा प्रत्यक्षच वाचणं उचित ठरेल. समाजाला स्वत:च्या कृतीनं आदर्श घालून देणारी ही कहाणी नुसती वाचावीच नव्हे तर संग्रही ठेवावी अशीच!

(नुकतेच करमरकर कुटुंबियांना मंगल पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यानिमित्ताने **सुनीलकुमार लवटे** यांनी दैनिक लोकमतमध्ये लिहिलेल्या लेखाचा समावेश या परिचयात केला आहे.)

पृष्ठे : १६४ ● किंमत : १२० रु. ● सभासदांना : ८४ रु. ● पोस्टेज : २० रु.

मेहता मराठी ग्रंथजगत | दीपावली २००४

दिवाळी अंकात काय वाचाल?

पुढच्या पिढीला आपण काय देऊ शकतो?

डॉ. आनंद यादव, डॉ.अश्विनी धोंगडे, प्र.के.घाणेकर,प्रमोदिनी वडके-कावळे, श्यामा घोणसे व इतर

अनोख्या उत्कट नात्याचे बंध उलगडणारे लेखन

डॉ. शंतनु चिंधडे, सुवर्णा दिवेकर, नसीमा हुरजूक, रा.रं. बोराडे व इतर

नव्या क्षेत्रातील आश्चर्यकारक माहिती देणारे लेख

डॉ. आर.एम्. शुक्ला ,प्रदीप कुरुलकर, मकरंद पुरंदरे

भरभरून प्रतिसादाच्या लेखस्पर्धेतील निवडक लेख

चित्रकथा, साहसकथा, मुलांच्या यशोगाथा, स्पर्धा, कोडी व गमतीजमतीची रेलचेल..

किंमत ४० रु.

वि. स. खांडेकर यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने..

खांडेकरांचे आजपर्यंत अप्रकाशित राहिलेले जे साहित्य गेल्या काही वर्षात आम्ही प्रकाशित केले आहे, त्यातील काहींची ही झलक. यातून खांडेकरांच्या वैचारिक उंचीचे जे दर्शन घडते ते आजही दिशादर्शक ठरेल यात शंका नाही.

दुसरे प्रॉमिथिअसः महात्मा गांधी

संपादनः
सुनीलकुमार लवटे

गांधीनींही जुलमी परसत्तेच्या पाशातून देशाला असेच मुक्त केले. मात्र त्यांच्या समग्र जीवनाचा विचार केला म्हणजे मनात येते, भारताचे राष्ट्रपितृत्व त्यांच्याकडे आले ते नियतीच्या क्रीडेमुळे. पण त्यांचे व्यक्तिमत्त्व असल्या कुठल्याही विशिष्ट विशेषणाच्या चौकटीत बसण्याइतके मर्यादित नव्हते. केवळ राजकारणातल्या यशापयशाने त्याचे मोजमाप करणे अन्यायाचे होईल. अष्टदिशांना सुगंध उधळीत जाणाऱ्या वायुलहरींनीच हे लोक विलक्षण व्यक्तिमत्त्व घडविले असावे! जगातले सारे दैन्य आणि दुःख जणू विसाव्यासाठी या महात्म्याच्या कुशीचा आसरा शोधीत होते. गवताच्या चिमण्या पात्यावर पडलेल्या दवबिंदूंचे कौतुक करणारे या महामानवाच्या मुखावरले स्मित, वादळी समुद्रातल्या डोंगर लाटांशी झुंज घेतानाही कधी मावळले नाही! नेहरू, विनोबा आणि मार्टिन ल्यूथर किंग हे आकाशातली नक्षत्रे खुडण्याचे सामर्थ्य असलेले तीन अत्यंत भिन्न प्रकृतीचे शिष्य गांधींना लाभावेत यातच त्यांच्या मोठेपणाचे रहस्य आहे.

गांधीजींचा स्थायीभाव होता प्रकाशपूजेचा. आयुष्यभर ते सत्याचा शोध घेत गेले हे खरे असले तरी मूलतः तो मांगल्याचा शोध होता. मनुष्यातल्या पशुत्वावर त्यांची माणुसकी सदैव कशी मात करीत राहील ही चिंता राजकीय, सामाजिक आणि आर्थिक चळवळींच्या भाऊगर्दीतही त्यांनी अखंड वाहिली.

मनुष्य कधीही तृप्त न होणाऱ्या वासनांचा गुलाम असतो. तो क्षणाचा सज्जन पण युगाचा दुर्जन आहे; अधूनमधून त्याच्यातल्या देवत्वाने पशुत्वावर प्रभुत्व गाजवले तरी ते दीर्घकाळ टिकत नाही. विशेष आत्मिक शक्ती असलेली एखादी व्यक्ती व्रतस्थ जीवन कंठू शकते, पण व्रतपालन हा समूह मनाचा धर्म नाही; ध्येयाच्या प्रभावी आवाहनामुळे एखाद्या समाजात श्रेष्ठ गुणांचा आविष्कार प्रत्ययाला आला तरी तो सामाजिक रक्तात भिनत नाही. पिढ्यापिढ्यांत संक्रांत होत नाही. ही व अशा प्रकारची कटुसत्ये वा अर्धसत्य इतिहासाने गांधीजींना सुनवली नसतील असे नाही. ज्याची भगवद्गीता, हा त्यांच्या जीवनसागरातला दीपस्तंभ होता, त्या श्रीकृष्णाच्या वाट्याला,त्याच्याच कृपेने सोन्याच्या द्वारकेत राहणाऱ्या यादवांनी कोणत्या प्रकारचे मरण आणले, ही कथा गांधींना अपरिचित असेल असे थोडेच आहे. पण त्यांची आत्मश्रद्धा आणि मानवश्रद्धा या दोन्ही अजिंक्य होत्या. इतिहास पढण्याकरिता नव्हे तर तो घडविण्याकरिता आपला जन्म आहे, या जाणिवेने ते शेवटच्या क्षणापर्यंत जगले.

माणसाच्या अंतःकरणाची नव्याप्रकारची जडणघडण (a revolution in the spirit of man) हा त्यांच्या सर्व प्रयत्नांचा केंद्रबिंदू होता. केवळ कायद्यानी सुखी, संयमी आणि समतापूजक मानव निर्माण होणार नाही, त्यासाठी त्यांच्या अंतरंगातच पालट झाला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता.

महापुरुष स्वभावतः अट्टाहासी असतात. पण मानवी जीवनाची ठेवणच अशी चमत्कारिक आहे की त्यात कुणाचाही, कुठलाही अट्टाहास सफल होत नाही. असे असले तरी कोणताही अट्टाहास करणाऱ्या महापुरुषाला डॉन क्विक्झोट मानणे हा शुद्ध वेडेपणा आहे. तो असतो प्रॉमिथिअसला नियती साखळदंडांनी बांधून ओसाड बेटावर ठेवीत असेल, त्याच्या जखमांवर गिधाडे टोचा मारीत असतील! हे सारे खरे असले तर दुसरी एक गोष्ट तितकीच खरी आहे-पिढ्यापिढ्यांतून केव्हातरी असा एखादा प्रॉमिथिअस निर्माण होतो. त्याने स्वर्गातून आणलेल्या अग्नीमुळेच मानवी संस्कृतीचे पाऊल पुढे पडत राहते.

गांधीजींच्या रुपाने विसाव्या शतकाला असा एक प्रॉमिथिएस्ट लाभला हे मानवतेचे महत् भाग्य. विजेच्या वेगाने होणाऱ्या विज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाच्या हाती राक्षसी शक्ती केंद्रित होत आहेत. या शक्तींचा लगाम आपल्या हातून सुटू नये अशी त्याची इच्छा असेल तर गांधीजींच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाच्या प्रकाशातच त्याला भविष्याची वाटचाल करावी लागेल. युगायुगाच्या या यात्रिकाच्या पाऊलखुणाच त्याला चिरंतन सुखशांतीचा मार्ग दाखवू शकतील.

पृष्ठे : १०८ ● किंमत : ७० रु. ● सभासदांना : ५० रु.
● पोस्टेज : २० रु.

सांजसावल्या

संपादनः
सुनीलकुमार लवटे

' क्रिकेट हा बोलून-चालून लहरी खेळ. प्राचीन काळातल्या राजासारखा. त्याच्या राज्यात क्षणाक्षणाला जीवदानं मिळतात आणि अनपेक्षित असे मृत्यू ही घडतात. अशा स्थितीत तो शतकवीर अमरपट्टा घेऊन आला आहे अशी समजूत करून घेऊन मी जे कल्पना चित्र रंगवलं होतं त्याला काही आधार होता का? तो खेळाडू असाच खेळत राहील, धावांचा डोंगर रचील वगैरे वगैरे स्वप्नांचा सात मजली इमला मी मनात उभारला होता. पण या इमारतीचा पाया वाळूवर होता. क्रिकेटचा प्रत्येक चेंडू यमदूत होऊ शकतो हे मी उत्साहाच्या भरात विसरून गेलो होतो.

माझा हिरो बाद झाला होता. पण त्याबद्दल मला वाटलेली हळहळ सर्वस्वी निराधार होती. फूल उमलतं, चार दिवस आपल्या सुगंधानं आणि रूपरंगानं भोवतालचं वातावरण प्रसन्न करून सोडतं आणि मग कोमेजून जातं. दररोज नियमानं पूर्वेकडं उगवणाऱ्या सूर्याला संध्याकाळी पश्चिमेकडे अंतर्धान पावावं लागतं. सृष्टीचक्राचा हा सनातन नियम आहे. त्याला क्रीडांगण तरी अपवाद कसं ठरणार? क्रिकेटच्या मैदानात उतरणारा प्रत्येक खेळाडू आपण केव्हा ना केव्हा तरी बाद होणार हे पुरेपूर जाणून असतो. पण ही जाणीव त्याच्या पराक्रमाच्या आड येऊ शकत नाही. आपण कधीही बाद होणार नाही अशा थाटातच प्रत्येक चेंडूला सुरेख रीतीनं कसं टोलवायचं या विचारातच तो मग्न असतो. आयुष्याच्या सामन्यातला प्रत्येक चेंडू यमदूत होऊ शकतो हे खरं! पण खेळणारा तो चेंडू यमदूत नसून आपल्या पदरात चौकार किंवा षटकार टाकणारा देवदूत आहे,अशा दृष्टीनेच त्याचं स्वागत करतो.

मनुष्यप्राणी पृथ्वीतलावर वावरू लागला तेव्हापासून अपराजित वृत्तीनं प्रत्येक प्रतिकूल गोष्टीशी झुंज देत आला आहे. दोन पायांनी तासाला चार मैल चालणारा आदिमानव आज मुंबईहून न्यूयॉर्कला चोवीस तासात जाऊ शकतो. परिस्थितीशी टक्कर देऊन तिच्यावर मात करण्याची जिद्द बाळगणं ही वृत्ती स्वभावतःच माणसात असते. हजारो सुखसोयींचा फायदा सहज मिळू लागल्यामुळे माणूस मनानं दुबळा होऊ लागला आहे की काय अशी शंका माझ्या मनात वारंवार येऊन जाते. निराशा, विफलता, अगतिकता वगैरेचा सर्व सामाजिक संदर्भात आपण वेळी अवेळी उल्लेख करतो. पण वैफल्यानं खापर तो कुणाच्या तरी माथी मारून चडफडत बसणार नाही. माणसाच्या कोशात वैफल्य, निराशा, पराभव असले शब्द अर्थशून्य आहेत.'

पृष्ठे : १०२ ● किंमत : ८० रु. ● सभासदांना : ५६ रु.
● पोस्टेज : २० रु.

अज्ञाताच्या महाद्वारात

संपादनः
सुनीलकुमार लवटे

'सभा समारंभामध्ये 'वंदे मातरम्' हे गीत म्हणून 'भारत माता की जय' असा आम्ही जयजयकार करतो, पण ज्या मातृभूमीला आम्ही वंदन करतो तिला आपल्या कोट्यवधी अर्धपोटी राहणाऱ्या लेकरांना पाहून काय वाटत असेल? याचा मात्र आपण विचार करीत नाही. इस्रायलसारख्या चिमुकल्या देशानं वीस वर्षांत वाळवंटात नंदनवन उभे केले ही कथा वाचताना आम्हाला गुदगुल्या होतात पण नंदनवनसारख्या असलेल्या आपल्या या भूमीला वाळवंटाची कळा का आली आहे? याची चिकित्सा मात्र आपण फारशी करीत नाही.

वस्तुस्थिती अशी आहे की, गेल्या वीस वर्षांत सर्वसाधारण सरकारी प्रेरणेने आणि सरकारी मदतीने कार्य करण्याचा परिपाठ सुरू झाला. सरकारी मदत ही कुठल्याही गोष्टीत आवश्यक आहे हे खरं, पण त्या मदतीने लोक प्रेरणाशून्य होता कामा नयेत. खेड्यापाड्यातल्या लोकांना प्रयत्नवादी करणं, विज्ञानाच्या साह्यानं आपली शेती आणि आपलं जीवन संपूर्णपणे कसं बदलता येईल याची जाणीव त्यांना करून देणं, ही गेल्या वीस वर्षांतील खरी गरज होती. या सर्व गोष्टी त्या कामाकरिता नेमलेल्या पगारी माणसाकडून घडाव्यात या अपेक्षा चुकीच्या आहेत. 'मोले घातले रडाया' असाच तो काहीसा प्रकार होतो. ही कामं घेऊन तिथं जाणाऱ्या अधिकाऱ्याकडून किंवा मेटाकुटीनं भरविलेल्या एखाद्या मेळाव्यातल्या वक्त्याकडून अथवा अशाच कोणत्याही प्रकारच्या वरवरच्या मार्गाने मनासारखी होणार नाहीत. त्याकरिता खेड्यापाड्यात जाऊन राहणारी, सुशिक्षित असूनही अशिक्षिताशी समरस होणारी, तिथलं अन्न आणि तिथल्या लोकांची रहाणी आपलीशी मानणारी माणसं निर्माण झाली पाहिजेत. गांधीजींनी या देशातल्या सामान्य माणसावर ज्या डोळस जिव्हाळ्यानं प्रेम केलं त्याचा थोडा तरी ओलावा खेडेगावात जाऊन उभ्या राहणाऱ्या अशा माणसांच्या अंगी हवा. केवळ सरकारी यंत्रणेने शेतकऱ्याच्या मनात आणि जीवनात मूलभूत परिवर्तन घडणार नाही. ते काम करण्याकरिता नव्या पिढीतल्या तरुणांनी खेड्यातल्या अडीअडचणी आणि सोयी-गैरसोयी यांची पर्वा न करता तिथं जाण्याची तयारी दर्शविली पाहिजे. स्वायत्झरसारखा त्रिखंड कीर्ती युरोपियन महापुरुष आफ्रिकेच्या जंगलातल्या रुग्णांच्या सेवेकरिता आपलं जीवन समर्पित करतो आणि बाबासाहेब आमट्यांसारखा आपल्यातलाच मनस्वी मनाचा एक पोलादी पुरुष सोमनाथच्या जंगलात जाऊन तिथं नंदनवन निर्माण करण्याकरिता दंड थोपटून उभा राहतो या घटनांचं मर्म आजच्या तरुण पिढीनं जाणून घेतलं पाहिजे. या जिद्दीनं जर या देशातील तरुण पिढी कामाला लागली तर अशा स्वाभिमानी, विज्ञाननिष्ठ आणि पराक्रमी तरुण पिढीलाच 'वंदे मातरम्' हे मान ताठ ठेवून खऱ्याखुऱ्या अभिमानानं गाता येईल.'

पृष्ठे : ७६ ● किंमत : ५० रु. ● सभासदांना : ३५ रु.
● पोस्टेज : २० रु.

क्षितिजस्पर्श

संपादनः
सुनीलकुमार लवटे

मी इंद्रधनुष्याला विचारलं, 'हे सात सुंदर रंग तुला कुणी दिले?'

त्यानं उत्तर दिलं. 'एका गायिकेचं गाणं ऐकता ऐकता माझं भान हरपलं. ते परत आलं तेव्हा तिच्या सुरांनी विणलेली ही सप्तरंगी शाल माझ्या अंगावर मला दिसली.'

क्षणभर मी विचारमग्न झाले. ती गायिका कुठं राहते? हे विचारण्याकरिता मी पुन्हा वर पाहिलं. आकाशात इंद्रधनुष्य नव्हतं. इंद्रधनुष्याला रंग देणाऱ्या त्या दिव्य गायिकेचं गाणं ऐकायला मिळावं म्हणून मी नगरं धुंडाळली, प्रासाद पालथे घातले. मैफलीत मग्न झालो. पण ती अनामिका मला कुठंच भेटली नाही.

माझ्या दिशाहीन भ्रमंतीत शेवटी मला तिचं दर्शन झालं. एका जीर्ण, निर्जन मंदिरापुढल्या भग्न दीपमाळेच्या चबुतऱ्यावर. ऐन मध्यरात्री.

तिचे सूर माझ्या कानी पडले. आणि मध्यरात्रीच्या काळोखात माझ्या मनात इंद्रधनुष्य उमलू लागलं. तिचं गाणं ऐकत मी स्तब्ध उभा होतो. माझ्या पुढ्यातल्या दीपमाळेसारखा.

आपल्या गानसमाधीतून ती गायिका बाहेर आली तेव्हा मी तिला म्हणालो, 'देवी, हे सुंदर सप्त स्वर तुला कुणी दिले?'

ती गात आहे असा भास व्हावा अशा मधूर स्वरात गायिका उत्तरली, 'वर पहा.' नक्षत्रखचित नभोमंडलाकडं मी पाहिलं.

तिनं मला प्रश्न केला,'ते सप्तर्षी पाहिलेस? युगायुगांची तपश्चर्या आहे त्यांच्या पाठीशी. यांना मी गुरु केलं. भान विसरून त्यांचा दिव्य मंत्रघोष मी ऐकत राहिले. कसे कुणाला ठाऊक, पण त्या मंत्रांचे माझ्या गळ्यात सूर झाले.'

सप्तर्षींना मी विनम्र वृत्तीनं विचारलं, 'ऋषीवर्य, तुम्हाला मंगल मंत्र कुणी दिले?'

सातही ऋषी हसले. क्षणभरानं गंभीरवाणीनं उद्‌गारले, ''पृथ्वीला सांभाळणाऱ्या सप्तसमुद्रांच्या तीरावर आम्ही दीर्घकाळ तप करीत होतो. शेवटी आदिमाया आमच्यावर प्रसन्न झाली. तिनं -''

''मीही त्या सात समुद्रांच्या तीरावर जाईन, तिथं तप करीन नी, सर्वत्र पसरलेल्या सौंदर्याचं रहस्य शोधून काढीन.''

सातही ऋषी पुन्हा हसले. मग वात्सल्यपूर्ण वाणीनं म्हणाले, 'वेड्या तुला साता समुद्रांची वारी करण्याचं काय कारण आहे. तुला मनुष्य जन्म लाभला आहे. मानव हे त्या आदिशक्तीचं शेंडेफळ आहे. तुझ्या अंतरंगातच सात समुद्र आहेत. त्या समुद्रातला पाणबुड्या हो.'

मुखवटे

संपादनः
सुनीलकुमार लवटे

ऐहिक जीवनात सज्जन टाचा घासून उपाशी मरत असताना दुर्जन महालात बसून पंचपक्वान्न खात असलेला आपण पाहतो! पण सर्व परंपरागत कथांचा शेवट आनंदीआनंदात व्हायचा हे ठरलेलंच आहे. या कथात दुष्टांना प्रायश्चित्त मिळतं. सज्जन सुखी होतात वगैरे वगैरे. संस्कृत नाट्य-वाङ्मयात शोकांतिका निर्माण न होण्याचं कारण आपली जीवनातल्या वास्तवाकडं पाहण्याची एकांगी दृष्टी हेच आहे. विसंगतींनी भरलेल्या जगात आपण सतत खोटी सुसंगती शोधीत राहतो. या वृत्तीनेच भारतीय मनाला दुर्बल व दैववादी बनवलं आहे. विशाल विश्वचक्राच्या मुळाशी असणाऱ्या शक्तीचं विनम्र भावानं चिंतन करण्याऐवजी ती उठल्यासुटल्या साऱ्या जगभर लुडबुडत असते, जगातली प्रत्येक लहान सहान घटना त्या परमशक्तीच्या इच्छेनेंच घडत राहते. मच्छरदाणीत चुकून शिरलेल्या डासांचं संरक्षण करायला ती शक्ती धावून येते असं गृहीत धरून त्याच्या आधारे आपण मानवी सुखदुःखांचा विचार करीत राहतो. वस्तुतः विश्वचक्राला गती दिल्यानंतर त्या परमशक्तीला तुमच्या आमच्या दैनंदिन जीवनात हस्तक्षेप करण्याची इच्छा असण्याचे कारण नाही. जन्म-मृत्यूचं कोडं उलगडत नाही म्हणून परमेश्वराचं अस्तित्व मानणं निराळं आणि त्या दिव्य शक्तीला पावलोपावली तुमच्या आमच्या भातुकलीच्या खेळात ओढणं निराळं!

आपल्याकडे अजूनही सर्वत्र नंगानाच घालणारी अंधश्रद्धा या अविवेकाच्या पोटीच जन्मली आहे. प्राचीन पौराणिक कथांपासून काल परवाच्या संतचरित्रांपर्यंत आपल्याकडे सर्वत्र जे चमत्कारांचं वेडं पीक दिसतं, त्याचा उगम डोळस, तेजस्वी भाविकतेत नसून दुबळ्या, आंधळ्या श्रद्धेत आहे.

अफझुलपूरकर बुवांचं कीर्तन ऐकल्यापासून एक इच्छा माझ्या मनात बळावली आहे. आपणही केव्हा तरी एक कीर्तन करावं, त्यात दामाजीपंतांचं आख्यान लावावं. मात्र त्या कथेचा उत्तरार्ध गुन्हेगार म्हणून पकडून आणलेल्या दामाजीपंतांनं बादशहाला सुनावलेल्या माणुसकीच्या खड्या बोलांनी वर्णन करून सांगावं. दामाजीपंतांच्या अंतःकरणातला जागृत ईश्वर बादशहाच्या मनातल्या निद्रित ईश्वराला कसा जागा करतो या प्रसंगात कीर्तनाचा शेवट व्हावा. विठ्ठलावर हरकाम्या गड्याप्रमाणे विठू महार होण्याची सक्ती करू नये.

माझ्या कीर्तनाला बहुधा गर्दी जमणार नाही. चुकून जमलीच तर हळुहळू एकेक श्रोता गुपचूप उठून जाईल हे मी जाणतो. पण दामाजीपंतांच्या त्या खड्या बोलात ईश्वरी शक्तीचं उरल्यासुरल्या श्रोत्यांना खरं दर्शन होईल. या विज्ञान युगात माणूस आसुसला आहे, तो मानवी हृदयातल्या ईश्वराच्या साक्षात्कारासाठी!

पृष्ठे : ९६ ● किंमत : ७० रु. ● सभासदांना : ५० रु.
● पोस्टेज : २० रु.

अजून येतो वास फुलांना

संपादनः
सुनीलकुमार लवटे

मी रामायणातल्या गोष्टीचे पुस्तक उचलले. माझ्या मनात आले, रामायणात काय कमी अद्‌भुतपणा आहे? जिथे पहावे तिथे चित्रविचित्र राक्षसांचा सुकाळ- यज्ञयागात, दंडकारण्यात आणि खुद्द लंकेतही कुणाला धड आहे तर डोके नाही. एक ना दोन. अद्‌भुताची नुसती भाऊगर्दी आहे.

असे असूनही कोणत्याही निमित्ताने रामायणाची ही कथा मनात घोळू लागली की आजही विलक्षण आनंदाचे काही क्षण मला लाभतात. असे का व्हावे, याचा मी विचार करू लागलो.

रामकथेचे बाह्यरूप अद्‌भुताने नटले असेल तरी तिचा आत्मा वास्तव आहे, हेच खरे. रामायणात सुंदर, तरुण पत्नीवर लुब्ध असणारा वृद्ध पती आहे, सवतीच्या मुलाकडे जाणारा सिंहासनाचा अधिकार आपल्या मुलाला मिळावा म्हणून हट्ट धरणारी आई, प्रिय पतीबरोबर हसतमुखाने चौदा वर्षांचा वनवास स्वीकारणारी पत्नी आहे. राग, लोभ, प्रेम, द्वेष, सेवा, सूड इत्यादि मानवी स्वभावातल्या भावभावनांची व विकार विचारांची कविप्रतिभेनं रंगविलेली अमर चित्रे येथे आहेत. सारे कुरुप-सुरूप मानवी जीवन अद्‌भुताची भरजरी वस्त्रे लेवून या कथेत प्रगट झाले आहे. आबालवृद्धांना ती मोह घालू शकते याचे कारण हे असावे.

अद्‌भूताच्या अगदी भिन्न अशा दोन जाती असतात. पहिली जात असते केवळ कल्पिताची 'अलिबाबाची गोष्ट' हा तिचा उत्तम नमुना. त्याची दुसरी जात असते कल्पनारम्यतेच्या कोंदणातून प्रगट होणाऱ्या दाहक वास्तवाची.

रामकथा हे या दुसऱ्या प्रकारच्या अद्‌भुताचे उत्कृष्ट उदाहरण. व्यक्तीच्या किंवा समाजाच्या बाल्यावस्थेत पहिल्या प्रकारची अद्‌भुताची मोहिनी जबरदस्त असते. चेटूक, जादूटोणा, मंत्रतंत्र, भुतेखेते वगैरे गोष्टी जशा लहान मुलाला खऱ्या वाटतात, तशाच त्या मानवी जातीच्या बाल्यावस्थेत प्रौढांच्याही श्रद्धेचा विषय बनतात. जसजशी ज्ञानविज्ञानाची प्रगती होऊ लागते, तसतसे पहिल्या प्रकारचे अद्‌भुत प्रौढांना खोटे वाटू लागते. दुसऱ्या प्रकाराच्या अद्‌भुताची गोष्ट मात्र निराळी आहे. ते वास्तव जीवनाला सर्व बाजूंनी वेढून उभे असते. जन्म, प्रेम आणि मृत्यू या मानवी जीवनातल्या जितक्या अद्‌भुत तितक्याच वास्तव अशा तीन प्रमुख घटना. पहिलीतली रम्यता, दुसरीतले माधुर्य आणि तिसरीतले कारुण्य ज्याच्या परिचयाचे नाही असा मनुष्य उभी पृथ्वी धुंडाळूनही सापडणार नाही. अद्‌भुताचे हे वलयच कुरूप वास्तवाशी माणसाला सदैव बांधून ठेवीत असते.

'रामायण' व 'अरबी भाषेतल्या गोष्टी' ही दोन्ही पुस्तके मी बालवयात जवळजवळ एकाच वेळी वाचली. त्यावेळी ती दोन्ही मला फार फार आवडली. त्यांची मी पारायणे केली. पण आता मागे वळून पाहिले की, ती दोन्ही मला सारखीच आवडत होती याचे आश्चर्य वाटते. आजही मला समग्र रामायण वाचण्याची लहर येते. मात्र अरबी भाषेतल्या गोष्टीत माझे मन पूर्ववत् रमू शकत नाही. याचे कारण एकच असावे. त्याकाळी मी आयुष्य जगलो नव्हतो. जगाची आणि जीवनाची मला काही कल्पना नव्हती. वास्तवांचे चटके त्यावेळी बसत नव्हते असं नाही, पण त्याच्यापासून दूर पळून जाण्याखेरीज मला दुसरे काही करता येत नव्हते. अल्लादिनला जादूचा दिवा मिळावा, त्याने तो घासताच त्याचा बंदा गुलाम असलेला राक्षस त्याच्यापुढं हात जोडून उभा राहावा आणि त्याने अल्लादिनची प्रत्येक इच्छा क्षणार्धात पूर्ण करावी, हे सारे जणू माझ्या बालमनाचेच प्रतिबिंब होते. अक्षर ओळख नसलेल्या बालकाने तत्त्वज्ञानाच्या ग्रंथावरून नजर फिरविली तरी त्याला त्याचा काही अर्थबोध होत नाही. माझीही तशी स्थिती होती. स्वप्नरंजन हा दाहक वास्तवापासून दूर पळून जाण्याचा एकमेव मार्ग! तो तेवढा त्यावेळी मला मोकळा होता. चमत्कारानी भरलेल्या अरबी भाषेतल्या गोष्टीत माझं मन त्या काळी रमलं ते यामुळे.

पण जन्मभर कुणीही स्वप्नरंजनात मशगुल होऊन राहू शकत नाही. जीवनाचा ग्रंथ कितीही दुर्बोध आणि अवघड असला तरी प्रत्येकाला आपापल्या परीने त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करावाच लागतो. हा अर्थ लावता लावता उग्र, कठोर आणि दाहक वास्तवाकडे निरखून पाहण्याचे व त्याला सामोरे जाण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी येते. रामकथा जन्मभर माझी सोबत करीत आली याचे कारण तिच्या अंतरंगात असलेली दाहक वास्तवाची जाणीव करून देण्याची शक्ती हेच होय. बालपणी तिच्यातील अद्‌भुताने माझ्या मनावर पगडा बसवला हे खरे. पण ठेचाळत ठेचाळत आयुष्याची वाट चालताना तिने मला अनेकदा धीरही दिला आहे. रामायणातील अनेक पात्रे वेष बदलून निरनिराळ्या रूपाने आपल्या भोवतीच वावरत आहेत असा भास प्रौढ वयात जेव्हा सामान्य माणसाला होतो, तेव्हाच तिचे मोठेपण त्याच्या प्रत्ययाला येते. अल्लादिनचा दिवा हा शेवटी जादूचा दिवा राहतो, पण रामकथा मात्र आयुष्याच्या उत्तरार्धात दीपस्तंभ बनते. आभाळ काजळून गेलेलं असो, समुद्रावर तुफानाने थैमान मांडलेले असो, अक्राळ-विक्राळ भासणाऱ्या खडकांनी नौकेची वाट अडविलेली असो, दीपस्तंभ कशाचीही कदर न करता या नौकेला प्रकाश दाखविण्याचे कार्य शांतवृत्तीने करीत राहतो. रामकथा मला आजही अतिशय आवडते. तिचे चिंतन करताना जीवनाचा खोलखोल अर्थ नव्याने उमगू लागतो. आयुष्य हे मंगल-अमंगलाच्या अखंड संघर्षाचे एक क्रीडांगण आहे याची जाणीव होऊ लागते. मग सर्व प्रकारची दुःखे आणि संकटे सोसण्याचे बळ अंगी येते.

पृष्ठे : ८४ ● किंमत : ६० रु. ● सभासदांना : ४२ रु.

● पोस्टेज : २० रु.

श्रद्धांजली

कुशल अनुवादक, सच्चा मित्र गेला!

रा. अ. कुंभोजकर

माझे कोल्हापूरचे परममित्र माधवराव मोर्डेकर सोमवार दि. २३ ऑगस्ट रोजी मेंदूतील रक्तस्त्रावाने अचानकपणे कालवश झाले. त्यांचे आजारपण केवळ आठवडाभराचे. पण तेच आजारपण त्यांना अखेरच्या प्रवासाला घेऊन गेले.

'तरुण भारत'ची सेवासमाप्ती करायचे नक्की ठरल्यानंतर माधवरावांना भेटण्यासाठी मी कोल्हापूरला गेलो. देवकर पाणंद या भागातील त्यांच्या घरी गेल्यानंतर ते बाहेर व्हरांड्यातच खुर्ची टाकून बसले होते. मी पुण्याला चिरंजीवांकडे कायमच्या वास्तव्यासाठी जात असल्याचे कळल्यावर त्यांना झालेला आनंद आणि त्यांचा उजळलेला चेहरा आजही माझ्या डोळ्यांसमोर जशाचा तसा उभा आहे. यानंतर एकदोन दिवसातच ते हॉस्पिटलमध्ये जातील आणि पुन्हा घरी परतणारच नाहीत, याची कुणालाही सुतराम् कल्पना नव्हती. पण दुर्दैवाने तसे घडले, हे मात्र खरे.

मंगळवारी जेव्हा सकाळी प्रकाशक अनिल मेहता यांचा मोर्डेकरांच्या निधनाचे वृत्त कळविणारा मला फोन आला तेव्हा प्रथम त्यावर माझा विश्वासच बसला नाही. पण कितीही अप्रिय वाटली तरी ती बातमी खरी होती. माधवरावांचा व माझा स्नेह गेल्या सोळा वर्षांचा. सोळा वर्षापूर्वी मी नोकरीत नुकताच रूजू झालो होतो. एक दिवस थोडे स्थूल वाटणारे, पँट व वर निळा बुशशर्ट घातलेले, कानावरचे केस चंदेरी झालेले एक गृहस्थ माझी चौकशी करीत, मी बसत असलेल्या दुसऱ्या मजल्यावरील हॉलमध्ये आले.

मी त्यांना बसायला सांगितले. ते म्हणाले, 'मी माधव मोर्डेकर. सध्याच्या राजकीय विषयाच्या संदर्भात एक लेख मी घेऊन आलो आहे.

'मी निवृत्त शिक्षक आहे. कोल्हापूरच्या शिक्षण प्रसारक मंडळाच्या वडगाव विद्यालयात मी अडतीस वर्ष शिक्षक होतो. शिक्षक, पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक, मुख्याध्यापक सर्व पदे भूषविली. नंतर सहा वर्ष बेळगाव जिल्ह्यातील रायबाग या प्रशाळेचा मुख्याध्यापक होतो मी आता पूर्ण वेळ मोकळा. लिहावाचायची पहिल्यापासून आवड आहे. राजकारण हा आवडीचा विषय.' एका दमात मोर्डेकरांनी बरेच काही सांगून टाकले.

१९८७ मध्ये महाराष्ट्र सरकारतर्फे मोर्डेकरांना आदर्श शिक्षकाचा पुरस्कार मिळाला होता, हे वाचल्याचे मला अंधुक आठवत होते. खात्री करून घेण्यासाठी मी याबद्दल त्यांना विचारले. तेव्हा माझी माहिती बरोबर असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला.

कोल्हापूरच्या सामाजिक जीवनात माधवराव परिचित होऊ लागले होते. त्यावेळी प्रकाशक अनिल मेहता यांचा मोर्डेकरांशी स्नेह जमला. अजबतर्फेही मोर्डेकरांची प्रारंभीची एक दोन पुस्तके निघाली, मग अनिलभाईंनी मेहता पब्लिशिंग हाऊस या स्वत:च्या प्रकाशनसंस्थेची स्थापना केली आणि मोर्डेकर या संस्थेचे मान्यवर अनुवादक झाले.

त्यांच्या साहित्यिक घडामोडीशी बऱ्यापैकी परिचय होता. कथा व कादंबरीकार रणजित देसाई, कादंबरीकार शंकर पाटील यांच्याशी त्यांचा स्नेह होता. वाचनाची आवड तर होतीच, पण राजकीय घडामोडीत व त्यावरील लेखनात ते अधिक रस घेत. मात्र त्यांचे इतर विषयाचे वाचन अथवा लेखन नव्हते असे नाही. क्रिकेट कर्णधार अजित वाडेकर यांच्या 'My cricketing years' चा मराठी अनुवाद त्यांनी १९६९ सालीच केला होता व हे पुस्तक अजब पुस्तकालयाने तेव्हा प्रकाशितही केले होते.

मेहता पब्लिशिंगमार्फत मोर्डेकरांची १८ विविध विषयांवरील पुस्तके प्रसिद्ध झाली. थोड्याच काळात माझीही मोर्डेकरांशी मैत्री झाली. मी बेळगावच्या 'तरुण भारत' अक्षरयात्रेत सहसंपादक म्हणून रुजू झालो. तरुण भारतमध्ये येताच मी त्यांच्याकडून अनेक लेख लिहून घेतले. त्यांची दोन तीन राजकीय सदरेही लागोपाठ अक्षरयात्रेत येत गेली. वाचकही मोडेकरांना राजकीय लेखक म्हणून ओळखू लागले.

तरुण भारतमध्ये लिहायला सुरुवात केल्यानंतर मग अक्षरयात्रा व पुस्तकांचे लेखन असा माधवरावांचा दुहेरी प्रवास चालू झाला. त्यांनी अनुवादिलेल्या 'प्लेन ट्रुथ' या पुस्तकाला पुणे मराठी ग्रंथालय या लौकिक प्राप्त संस्थेने कै. नारायण हरी आपटे स्मृति पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला. मेहता पब्लिशिंग हाऊसने नव्यानेच सुरू केलेल्या कै. रणजित देसाई स्मृति पुरस्काराचा एक मानकरी होण्याचे सौभाग्य त्यांना लाभले.

या नंतरच्या काळात अरुण शौरी, कुलदीप नैयर, राम प्रधान आदि लेखकांच्या इंग्रजी ग्रंथाचे सुरस मराठी अनुवाद मोर्डेकरांनी केले. 'बिग इगोज, स्मॉल मेन' या राम जेठमलानी यांच्या मूळ इंग्रजी पुस्तकाचा अलीकडेच त्यांनी केलेले अनुवाद रसिकमान्य ठरला आहे. योद्धा शास्त्रज्ञ : राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम या त्यांच्या पुस्तकाचा सुरस अनुवादाचा खास उल्लेख करावा लागले.

प्रारंभीच्या काळातील 'इंदिरागांधींची दोन रूपे' किंवा 'फ्रिडम ॲट मिडनाईट' या पुस्तकांच्या अनुवादानी मोर्डेकरांना या क्षेत्रात नाव मिळवून दिले. हे मान्यच करायला हवे.

अनिलभाईंचे चिरंजिव सुनील मेहता हे आता प्रकाशनाचा व्याप पुण्यातून सांभाळतात. सुनीलचे आणि माधवरावांचे सूरही आता चांगले जमले होते. त्यांचे स्वामी विवेकानंदावरील पुस्तक छापून झाले असून, सुनील ते मोठ्या समारंभाने प्रकाशित करणार होते. पण ते पाहायला मोर्डेकर आज आपल्यात नाहीत.

अनुवाद करताना मराठीत लिहावे इतके सहज सौंदर्य आणि प्रास्ताविकता त्यात उतरली पाहिजे, असे मोर्डेकर म्हणत. त्यांच्या पुस्तकाचे कुठलेही पान उघडून वाचायला लागलो तर ही सहजसुलभता त्यात दिसते, कुठेही रूक्षता जाणवत नाही.

माधवरावांच्या स्वभावात आणखी एक प्रशंसनीय गुण होता तो म्हणजे कुणाचे काही उत्तम लेखन वाचले की आपली खुषीपत्रे ते त्या लेखकांना रवाना करीत. त्यातले आपल्याला काय आवडले हे त्या पत्रात ते लिहीत. शोभा बोंद्रे यांचे 'मस्त कलंदर' नावाचे पुस्तक ते प्रसिद्ध होताच माधवरावांनी ते वाचले. आपल्याला ते खूप आवडल्याचे लगेच त्यांनी लेखिकेला लिहिले.

माधवरावांनी ललित लेखन केले नसेल, पण ललित लेखन करणाऱ्या गुणी लेखकांबद्दल त्यांना प्रेम होते, म्हणूनच रणजित देसाई अथवा शंकर पाटील यांच्याशी त्यांचा दोस्ताना होता. अशोक जैन यांनी केलेले अनुवाद त्यांना आवडत. त्यांचे इंदिरा गांधींच्यावरील पुस्तक किंवा 'बिझिनेस महाराजे'हा अनुवाद त्यांच्या आवडीचे होते. ही पुस्तके जेव्हा प्रकाशित झाली तेव्हा भरभरून प्रशंसा करणारी पत्रे त्यांनी जैनांना पाठविल्याचे मला आठवते. यामुळेच या दोन अनुवादकांची मैत्री जमून आली होती.

आपल्या शिक्षकी पेशाबद्दल त्यांनी एका ठिकाणी लिहिले आहे. 'सेवाकालात मातृसंस्था, शिक्षक-विद्यार्थी-पालक यांचे भरपूर प्रेम मला लाभले. शाळा नावारूपाला आणण्यासाठी माझ्यापरीने मी मनोमन कष्ट केले, त्याचे चीज झाले.' सेवानिवृत्तीच्या निमित्ताने निरोप देताना सहकारी, पालक व आजीमाजी विद्यार्थ्यांनी ५१००० रुपयांचा कृतज्ञता निधी माधवरावांना अर्पण केला. त्यात स्वत:च्या सहा हजाराची भर घालून एक विश्वस्त न्यास त्यांनी स्थापन केला आहे.

माधवराव पूर्वी कोल्हापुरातील सरलष्कर भवनमध्ये राहात असत. त्यांचे काही मित्र येथून जवळच्या अंतरावर होते, बाजारहाट जवळ होता. अनिल मेहतांचे पुस्तकाचे दुकान जवळ होते. इथे राहात असताना केव्हा कुठे जायचे याचे एक कोष्टकच त्यांनी बसवून घेतले होते. पण चिरंजिवांनी गावापासून दूर अशा देवकर पाणंदमध्ये घर बांधले. तिथे राहायला जाणे भागच होते. मग गावाशी असलेला संबंध तुटला. मित्रांच्या गाठीभेटीतही खूप अंतर पडू लागले. मोर्डेकर सांगत,'अलीकडे तब्येत बरी नसते. आता गावात यायचे तर आपण सोडूनच दिले आहे. केव्हातरी मेहतांच्या दुकानात जातो. अनिलभाई नसतील तर व्यवस्थापक नाईक यांच्याबरोबर अर्धातास गप्पा मारतो नि पुन्हा देवकर पाणंदची बस पकडून परत येतो.'

पावसच्या महाराजांवर त्याची विशेष श्रद्धा होती. सकाळी आंघोळ झाल्यावर डोळू मिटून ते स्तोत्र पठण करीत. महाराजांचे फोटो चार पाच वेळा मस्तकी लावत.

चार साहित्यिकांच्या गराड्यात माधवराव बोलायला संकोचत. थोड्याशा स्पर्शाने लाजाळूच्या झाडाची पाने मिटतात, तसे माधवराव लाजून मूक होत. त्यांचा भर बोलण्यावर नव्हता, लिहिण्यावर होता.

* 'ही तर साहित्य क्षेत्रातील अद्‌भुत घटना...'

कैदी आणि पोलिसांकडूनसुद्धा काव्यरचना केल्या जातात, माझ्या मते २१ व्या शतकातील मराठीतच नव्हे तर एकूणच साहित्य क्षेत्रातील ही अद्‌भूत घटना आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे यांनी पुरस्कार समारंभ बोलताना केले.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने नवोदित कवी व लेखकांसाठी जाहीर केलेले यशवंतराव चव्हाण वाङ्‌मय पुरस्कार वितरित करण्याच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमासाठी राज्याच्या प्रधान सचिव (तुरुंग) व कवयित्री नीला सत्यनारायण यांनाही खास आमंत्रित करण्यात आले होते. या दोघांच्या हस्ते मानकऱ्यांना पुरस्कार देण्यात आले. मंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रा. रतनलाल सोनग्रा हे अध्यक्षस्थानी होते तर मंडळाचे सदस्य अर्जुन डांगळे यांनी प्रास्ताविक करून निरंजन उजगरे यांनी संचलन केले.

यावेळी विजया चाटी यांना 'अशी ही एक कुंती'या कथेसाठी, देवकुमार जावीर यांना 'ती विना सौभाग्यवती'या नाटकाकरिता, डॉ. मारूती गुरव यांना 'गुलाबकन्या' या बालकाव्याबद्दल तर शिवाजी साळुंके यांना 'आत्मझड' या काव्यासाठी यशवंतराव चव्हाण वाङ्‌मय पुरस्कार देण्यात आले. तसेच 'आत्मझड'च्या प्रकाशनासाठी 'साकेत' प्रकाशनला सरफोजीराजे भोसले पुरस्कार प्रदान करण्यात आला.

गजाआडचे शब्द!

यावेळी सर्वांचे लक्ष ज्यांनी वेधून घेतले ते पैठणच्या खुल्या तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगणारे व 'आत्मझड' चे अत्यंत संवेदनशील कवी शिवाजी साळुंके यांनी. तुरुंगात राहूनसुद्धा त्यांनी आपली प्रतिभाशक्ती चेतवत ठेवल्याचा प्रत्यय वानगीदाखल त्यांनी सादर केलेल्या कवितेमुळे आला.

'इथल पत्रं तत्वज्ञान सांगतं, अध्यात्म बोलतं,' एकूण एक धर्माच्या प्रतिमांनीही सजतं आणि झाडून साऱ्या देवा-धर्मांना कमरेखालच्या जागेवरही बसवतं...' या काव्यपंक्ती ऐकूनच नारायण सुर्वे यांनी साहित्यक्षेत्रातील या बदलाची निश्चितच नोंद घेतली पाहिजे, असे नमूद केले.

* कुमार केतकर यांना 'एकमत' पुरस्कार जाहीर

लातूर येथील एकमत दैनिकातर्फे दरवर्षी देण्यात येणारा 'मातु:श्री' सुशीलादेवी देशमुख एकमत राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार' दैनिक लोकसत्ता' संपादक कुमार केतकर

यांना जाहीर करण्यात आला आहे. ११ हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

यापूर्वी हा पुरस्कार गोविंद तळवलकर, अरुण टिकेकर, विजय कुवळेकर, वि. वि. करमरकर, मोहन बने, महावीर जोंधळे, बाळासाहेब जाधव, मधुकर भावे, विवेक घळसासी, एस. के. कुलकर्णी आणि अरविंद व्यं. गोखले यांना देण्यात आला आहे. मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष कुमार कदम, मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष रविकिरण देशमुख, तसेच विद्याविलास पाठक आणि अभय देशपांडे व पांडुरंग कोळगे यांच्या निवड समितीने केतकर यांची या पुरस्कारासाठी निवड केली.

*** चंद्रकांत अंबाडे यांना 'साहित्य भूषण' पुरस्कार**

नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे यावर्षीचा साहित्य भूषण पुरस्कार भुसावळचे चंद्रकांत अंबाडे यांना मिळाला आहे.

या पुरस्कारासाठी प्रतिष्ठानातर्फे सर्व क्षेत्रातील इच्छुक विद्याविभूषितांची उच्चपदव्युत्तर स्वरूपाची साहित्य विषयक अभ्यासपूर्ण परिक्षा घेतली जाते. चांगल्या प्रकारे सफलता मिळविणाऱ्यांना सन्मानपूर्वक 'साहित्य भूषण' पदवी आणि पुरस्कार देण्यात येतो. महाराष्ट्रातील विविध भागातील उच्च पदवीधर, डॉक्टर्स, अभियंते, व्यावसायिक पण मराठी साहित्याची आवड असणाऱ्या सुमारे ४०० लोकांमधून गुणानुक्रमे निवड करून फारच मोजक्या व्यक्ती या पुरस्कारास पात्र ठरल्या आहेत. त्यात रोटरी क्लब पुरस्कृत श्री अष्टभुजा नागरिक संघाचे गतवर्षीचे अध्यक्ष अंबाडे यांची निवड झाल्याने परिसरात समाधानाचे वातावरण आहे.

नुकताच नाशिकच्या जनलक्ष्मी सहकारी बँकेच्या भव्य हॉलमध्ये त्यांना हा पुरस्कार मराठी साहित्य परिषद, पुणे चे अध्यक्ष चंद्रशेखर धर्माधिकारी, परीक्षा समितीच्या कार्याध्यक्षा भावना भार्गवे, ॲड. विलास लोणारी, प्रतिष्ठानाचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत वर्तक, आदर्श माध्यमिक शाळेच्या निवृत्त मुख्याध्यापिका सौ. सुनिता जोशी,भुसावळचे अष्टभुजा नागरिक, संघाचे उपाध्यक्ष प्रा. अनंत बळेल, प्रभाकर टकले आदी प्रतिष्ठीत मंडळीच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक बहाल करण्यात आला. पुणे अनाथ विद्यार्थीगृह, नाशिक शाखेतही अंबाडे यांचा माजी विद्यार्थी या नात्याने सत्कार व व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

*** ग्रंथमित्र पुरस्काराचे वितरण संपन्न**

ग्रंथालय संचालनालय तर्फे २००३-२००४ महदे उत्कृष्ट ग्रंथालय, कार्यकर्ता, एस.आर. रंगनाथन् ग्रंथमित्र पुरस्काराचे वितरण मुंबई येथे चर्चगेट जवळ सिडनहॅम वाणिज्य महाविद्यालयात डॉ. एस. आर. रंगनाथन् यांचे जयंती दिनी संपन्न झाले.

प्रथम पुरस्काराबाबत शासनाची भूमिका, निवड प्रक्रियाची माहिती संचालक मो. भु. मेश्राम यांनी दिली. प्रमुख पाहुणे मनोहरराय नाईक उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, गंगाधरराव पटणे अध्यक्ष राज्य ग्रंथालय लंघ, यांनी दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले. मनोहरराव नाईक यांचे हस्ते मराठवाडा विभागातून डॉ. एस. आर. रंगनाथन् ग्रंथमित्र पुरस्कारासाठी भगवान भुजंगराव बनसोडे ग्रंथपाल यांचा सत्कार, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, रूपये पंधरा हजार देऊन करण्यात आला. याच वेळी उत्कृष्ट ग्रंथपाल, कार्यकर्ता याचाही सत्कार करण्यात आला. ❐



अनुक्रमणिका

हसण्याची करामत	५२
वेड्याचे चित्र	५४
लपलेल्या संख्या शोधा	५५

हसण्याची करामत

सारखं उठसूठ राघवला हसायची सवय होती.
हा हा हा
काय झालं राघव? का हसतीयस एवढा?
बाबा चष्मा तुमच्या नाकावर घसरलाय हा हा हा
एकदा राघव आई बरोबर बँकेत गेला
मोहा काम होईपर्यंत इथे या सोफ्यावर बस
ठीक आहे आई
एवढ्यात
पळा पळा
डाकू आलेत
असाल तेथेच थांबा कोणीही हलू नका आम्ही फक्त पैसे घेणार आहोत
चिना तू पैसे पिशवीत भर आम्ही गाडीपाशी थांबतो.
नंतर
हा हा हा हा ही हा

इथे साध्या वेषातले पोलीस असले पाहिजेत म्हणून ती हसती आहे.
हो आपल्याला पकडायचा सापळा असेल
टप्पू आपण सापळ्यात सापडायच्या आधी पळूया जाऊ या
ही मलाही तसाच संशय वाटतोय
जेव्हा दरोडेखोर घाबरून पळू लागले वॉचमन त्वरेने पुढे आला
हलू नका नाहीतर मी गोळी घालीन- कोणीतरी पोलिसांना फोन करा.
थोड्या वेळाने पोलिस आले.
अभिनंदन! तू अगदी दक्ष वॉचमन आहेस
या सर्वांचं श्रेय या प्रसंगावधानी मुलाचं आहे
मला सांग, मुला तुला ही भन्नाट कल्पना कोणी सांगितली?
भन्नाट कल्पना? कल्पना वगैरे काही नाही मला एक मजेदार गोष्ट दिसली
... त्या माणसाच्या नाकावरचा तो मोठा मस!
हा! हा!
हं! हं!

वेड्याचे चित्र

खालील चित्र एका वेड्याने काढले आहे. त्यात त्याने खूप चुका केल्या आहेत. पहा बघू तुम्हाला चुका सापडतात का ते! चित्रतल्या चुका ओळखा व बक्षीस जिंका!

अचूक उत्तरे पाठवणाऱ्या पहिल्या ३ मुलांना छान छान चित्रांची आकर्षक २ पुस्तके बक्षीस! उत्तर पाठवताना आपले नाव, पत्ता व इयत्ता लिहायला विसरू नका.

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत**, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०

लपलेल्या संख्या शोधा

खालील चित्रात संख्या लपलेल्या आहेत. संख्या शोधून काढा आणि निळ्या शाईने रंगवा.

अचूक उत्तरे पाठवणाऱ्या पहिल्या ३ मुलांना छान छान चित्रांची आकर्षक २ पुस्तके बक्षीस! उत्तर पाठवताना आपले नाव, पत्ता व इयत्ता लिहायला विसरू नका.

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत**, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०

आमची पुस्तके मिळण्याची ठिकाणे व फोन नंबर्स

पुणे : मॅजेस्टिक,२४४५९८१५ / रसिक,२४४५११२९ / वसुधा मेडिको,२५६७६१९९
राका,२४४५८११७ / विद्या एजन्सीज,२४३३५४४८ / वर्मा २४४५६५२५
उत्कर्ष,२५५३२४७९ / डायमंड,२४४८०६७७/ रविंदु / उज्वल २४४५६९०८
परेश, २४४५९१९० / अनमोल ,२४४५७०६६ / पाटील,२४४८७६२९
बुकलॅण्ड, २४२२१०४३ / श्री समर्थ एजन्सीज, २४४८३९१६ / महाजन ब्रदर्स, २४४८९९६६
पाथफाईंडर, २४३३०७०१/ **सहकारनगर** - नखाते सीमा २४२२५१८०
निगडी : आत्मदीप पुस्तकालय, २७४५७६९४
बारामती : औदुंबर, २२४५४
मुंबई : आयडियल, २४३०४२५४ / मॅजेस्टिक दादर, २४३०५९१४ / हळबे, गिरगाव २३८८४९६४/
जवाहर पार्ले, २६१४८७३५/ मॅजेस्टिक, विलेपार्ले ३०९१३२३४ / शब्द,बोरिवली २८३३२६४०
वाशी (नवी मुंबई) : वर्षा वितरण २७८२५४६४
ठाणे : मॅजेस्टिक, २५३७६८६५ / **डोंबिवली** - ज्ञानदा, ८६२५८९ / मॅजेस्टिक, ८०११०१
दिपाली ४३७६७१/ **कल्याण**- सरस्वती २०४७८१ / **विरार**- मुद्रा २५११०९१
बदलापूर - ग्रंथसखा २६७३०७१
नाशिक : ज्योती २३०६७० / चौधरी, २५७४४८१ / दीप ,२५९४४९८ / करण २३१४२४५
नागपूर : साहित्य प्रसार, २५२३७०२ / नागपूर पॉप्युलर, २५२४२७८
नांदेड : अभय , २४०२६५ **लातूर** : भारतीय पुस्तकालय, २४८३८४
औरंगाबाद : विद्या बुक्स, २३३७३७१ / श्री बालाजी, २६५३८५४ / अमॅझॉन २३३५२२०
वडवळ नागनाथ : गजानन बुक स्टॉल,५५८७१ **कराड** : दिलखुष,२२२८३३
सातारा : लोकमान्य ग्रंथ भांडार, २३७४३६ **अकोला** : मिहीर उद्योग केंद्र, २४४२१३८
सांगली : स्टुडंटस्, २३७४२५० / ताम्हनकर, २३७३६०५ / **मिरज** रत्नाकर, २२२२५६४
खामगांव : गोर्ले बुक स्टॉल, २५५२६४ **वर्धा** : केळकर ब्रदर्स, २४३६५८
सोलापूर : सरस्वती बुक डेपो, २६२६६३०/ कुंदूर बंधू पुस्तक भांडार, २६२६१५६/
नंदादीप बुक सर्व्हिसेस, २६२८३३२ **अमरावती** : पॉप्युलर बुक सेंटर, २५७३०८१
भंडारा : अनामिका बुक एजन्सीज **रत्नागिरी** : ग्रंथस्नेह ग्रंथ वितरण, २२४८६८
जळगाव : प्रशांत , २२२७२३१ / शारदा प्रकाशन व बुक डेपो, २२२३७६५
धुळे : मनोज पुस्तकालय, २३४३९२ **गोवा** : वर्षा २४२५८३२
अहमदनगर : बापट २३४४५४२/ उदय २३४७३०७ / ललित २२२३०३१